# समरसता

## साहित्य पत्रिका

वर्ष ६, अंक ११, जुलै २०२६






**घननिळा मेघदूत**
(कालिदासाच्या 'मेघदूत' या खंडकाव्यातील
यक्षाच्या भावना.)

घननिळे आभाळ ऐसे
सावळ्या परि जाहले
का तयाचे हृदय दु:खी
माझ्या परी विरही जाहले?
आर्तता माझ्या मनाची
जा तिला सांगून ये
कमलमुखी कोमेजली
अन् नेत्र तिचे पाणावले...

हे नभा, जा सांग प्रियेला
आर्तता माझ्या हृदयीची
आठ महिने विरहाग्नीने या
थंड वारे पोळले...

ही सुगंधी अत्तरापरी
रंग वर्णी पाहुनी सुमने
आठवे चेहरा तिचा
मन वेदनांनी हासले...

उत्तरेच्या उज्जैनीला
गवसणी घालून येता
सुवर्णमंडीत रत्नमंडित
कुबेराघरी ने पावले...

घेऊनी सुमने मोजुनी ती
पाहते रे वाट माझी
नेत्र तिचे हरिणीपरी लोभस
आसवांनी लाल झाले...

ज्या ठिकाणी बारमाही सोहळा
हा सहा ऋतूंचा त्या ठिकाणी
दु:ख नव्हते, सुख नशिबा
बोचले...

स्फटिकांनी रत्नमंडित
झोका जेथे घेई मयूर
आतुर तिथेही यक्षप्रिया
अन् फितूर सारी वादळे...

अवंती नगरीत या
पानांवरी दवांचे शहारे
मोतीयाचा बहर भूवरी
रत्नकांचन सोहळे...
हे नभा, तव रंग पाहुनी
आठवे काजळ प्रियेचे
स्फुंदताना डोळ्यातूनी
आषाढ घन तिने गाळले...

या आषाढाच्या दिनी होते
भेट धरणी पावसाची
पाहुनी त्या आर्त भेटी
काळीज माझे फाटले...

**प्रा. डॉ. सौ. दुर्गा गंगाधर जोशी,**
सोलापूर

रात्र लागली सूर्य गिळू
जागण्याची आली वेळ,
नको झाकूस पापण्या
दूर कर आता झाकोळ.

ताकदवान असे मित्रा
तारुण्याचा उंबरठा,
जागा कर आता आतले
ज्वालामुखीचा तू साठा.

उचलून आता गोवर्धन
तुझा तुच हो कृष्ण,
वेदनेने ओघळले ते
डोळ्यातून अश्रू कोष्ण.

चालण्यास मिळे बळ
हातामध्ये असोत हात,
काट्यातून फुटे वाट
जिद्दीने करशील मात.

**– डॉ. राजेंद्र माने**

# समरसता
साहित्य पत्रिका

**वर्ष ६, अंक ११, जुलै २०२६**

**संपादक**
रवींद्र गोळे
**संपादक मंडळ**
प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे
डॉ. रमा गर्गे
प्रा. गजानन होडे
**प्रकाशक**
**समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र**

**अंतरंग**

संतांच्या शब्दातून पंढरीची वारी ४

महाराष्ट्राची वारी परंपरा : भक्ती, समता आणि श्रद्धेचा अखंड प्रवाह ८

वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्। ११

गरिबी : अभाव नव्हे, तर संघर्षातून घडणाऱ्या माणुसकीची शाळा १४

प्रेरणादायी 'संवाद भूषण' १७

मी एक महातारा! १९

दडगं २१

**कविता :**
प्रा. डॉ. सौ. दुर्गा गंगाधर जोशी,
डॉ. राजेंद्र माने

**मुखपृष्ठावरचे चित्र**
**अंतरजालावरून साभार**

**मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन**

**संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका**
**१/६ जैन इस्टेट, विलेज रोड,**
**भांडूप (प.), मुंबई – ७८**
**इमेल :** samarastaedit@gmail.com

**खाजगी वितरणासाठी**




आज आषाढी एकादशी. महाराष्ट्राचा महासमन्वय घडवून आणणारे लोकनियंत्रित जनित्र. जात, भाषा, पंथ, प्रदेश यांच्या पलीकडे जाऊन समूहाने एका दिशेने केलेली वाटचाल म्हणजे पंढरीची वारी. पंढरपूरच्या वारीची परंपरा खूप प्राचीन असून तिने समाजमन घडवले आहे. पारतंत्र्यात आणि स्वातंत्र्यातही वारी अबाधित राहिली आणि समाजाला दिशा देण्याचे काम केले.

महाराष्ट्रातील संत परंपरा आणि पंढरीची वारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. संतांनी केलेल्या प्रबोधनाचे प्रकटीकरण वारीतून दिसून येते. भेदभावमुक्त जीवन आणि समतेचा डांगोरा पिटणाऱ्या पंढरीच्या वारीने सातत्याने समाजाला संघटित केले आहे.

वारी म्हणजे नेम, स्वतःसाठी स्वीकारलेले व्रत. परब्रह्मस्वरूप पांडुरंगाला सर्वव्याप्त मानून केलेली भावभक्ती म्हणजे वारी. वारीच्या वीस दिवसांत जे अनुभवास येईल त्याचे पुढे वर्षभर अनुकरण करायचे, वारी स्वतःमध्ये मुरवून घ्यायची, अशी इथली जनरीत. संतांनी सांगितलेल्या समतेचा मार्ग चालत राहायचा असा इथला लोकव्यवहार. आपणही सर्वजण या लोकव्यवहाराचे सजग पाईक आहेत. आपणही समरसता दिंडीचे वारकरी आहोत ही जाणीव आपल्या हृदयात सदैव जागी असते. ती वृध्दिंगत होत जाओ. माऊलींच्या पसायदानाला वास्तव रूप देण्याचे बळ आपल्या सर्वांना मिळो, हीच पांडुरंगाला प्रार्थना.

**– रवींद्र गोळे**




# संतांच्या शब्दातून पंढरीची वारी...

**वारकरी तथा भागवत संप्रदायातील थोर संत, विश्‍व माऊली, कार्यसम्राट अशा संत ज्ञानदेवांनी या वारीचा महिमा आपल्या गोड अशा शब्दातून व्यक्त केला आहे. ‘पंढरीचे वाटे अनंत घडती याग.. वैकुंठीचा मार्ग देणे संगे.. जप तप अनुष्ठान क्रिया कर्म धर्म.. हे जाणता ती वर्मा संतजन.. भक्तिमार्ग फुकटा आनंदाची पोहे लागलीसे सवे पुंडलिका.. दिंडी टाळ घोळ गरुड टकियाचे भार.. वैष्णवांचे गजर जय नगरी...’ असं म्हणत या वारीचा महिमा व्यक्त केला आहे. क्षेत्र पंढरपुरास निघालेला भाविक मनुष्य नामस्मरण करत वाटेने चालला असता त्याच्या चालण्यामध्ये पावलोपावली यज्ञ घडत असतात व त्या यज्ञापासून होणारी पुण्याई त्यास प्राप्त होते. त्यामुळे वैकुंठप्राप्तीचा मार्ग त्यास सुलभ होतो. जपतप अनुष्ठान क्रिया कर्मधर्म हे सर्व पांडुरंग आहे, असे साधुसंत जाणतात.**

**डॉ. मार्तंड दिवाकर कुलकर्णी**
९४२१७५८०३२

पंढरीचा विठ्ठल अवघ्या महाराष्ट्राचे एक परम श्रेष्ठ दैवत. ज्याच्या त्याच्या ध्यानीमनी पंढरीचा पांडुरंग. या दैवताची कमालीची ओढ मराठी मनास सततची असते. पांडुरंगाला एक जिवलग सोयरा मानून त्याच्यापाशी आपली तहानभूक, मनीची गुज सांगावी असे प्रत्येकालाच वाटते. आणि पुढे जाऊन आषाढी–कार्तिकीच्या वारीत पायी जात आपल्या प्राणप्रिय विठ्ठलाला कधी कधी पाहावे, कडकडून भेटावे, यांच्या समचरणावर डोके ठेवून ही सावळी मनोहर अशी मूर्ती डोळे भरून पाहावी, पुन: पुन्हा मनात साठवावी असे कायमचे वाटत आले आहे. मनात, हृदयात असलेला विटेवर उभा असलेला हा पांडुरंग याची देही याची डोळा पाहण्यासाठी गेल्या अनेक शतकांची ही वारीची परंपरा आपल्या महाराष्ट्राचं एक भूषण म्हणावं लागेल. पंढरीच्या वारीची महाराष्ट्रात एक विलक्षण अशी परंपरा आहे. जसा जसा आषाढ महिना जवळ येऊ लागतो तसतशी भक्तांना विठुरायाला पाहाण्याची, त्याचे गोड सुंदर रुपडे डोळ्यात साठवून ठेवण्याची, त्याच्या चरणाला स्पर्श करून आपले गर्वाने उंचावलेले मस्तक त्याच्या चरणावर टिकविण्याची विलक्षण घाई झालेली असते. या परमात्म्याला भेटण्यासाठी वाटेल त्या प्रयत्नातून तो वारीत सहभागी होतो आणि संकीर्तनात आनंदाने बेहोश होऊन पंढरीपर्यंत राम कृष्ण हरी.. विठ्ठल विठ्ठल.. माऊली माऊली म्हणत असतो. अशा या वारीत सर्वच जण गर्व, अभिमान, श्रीमंती, उच्च–नीच हा भाव विसरून एका विचाराने, एका ध्येयाने, एका तत्त्वाने सहभागी होतात. अशी ही वारी महाराष्ट्रातील अनेक पुण्य पावन अशा संतांच्या कर्मभूमीतून, क्षेत्रातून निघून

पंढरपूरपर्यंत पोहोचते. श्रीक्षेत्र आळंदी, देहू, पैठण, शेगाव, त्रंबकेश्वर, मुक्ताईनगर या व अशा अनेक क्षेत्रांवरून लाखो वारकरी खांद्यावर भगवी पताका घेऊन पंढरीच्या वाटेने विठ्ठल विठ्ठल करत मजल दरमजल करत आपल्या लाडक्या दैवताला पाहण्यासाठी वारीत सहभागी होतात.अशी ही वारी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक व ऐक्याच्या परंपरेचा एक महत्त्वाचा भाग ठरलेली आहे.

'अवघाची संसार सुखाचा करीन... आनंदे भरीन तिन्ही लोक, जाईन गे माय तया पंढरपुरा... भेटेन माहेरा आपुलिया' असं म्हणत पंढरपूर हेच माझे माहेर, पंढरपूर हाच आमचा विसावा आणि पंढरपूर हेच आमचे वैकुंठ म्हणून महाराष्ट्रातील सर्वच संतांनी पंढरीच्या वारीचा महिमा आपापल्या शब्दांमध्ये वर्णन केलेला आहे. विठ्ठल हा देव भक्तांचा कैवारी आहे. फक्त पुंडलिकासाठी तो २८ युगांपासून विटेवर उभा आहे. भक्त आणि देवाचे जिव्हाळ्याचे नाते संतांनी आपल्या अभंगवाणीतून वर्णन केले आहे. याचप्रमाणे या क्षेत्राचा म्हणजेच पंढरपुराच्या वारीचासुद्धा सुंदर असा महिमा अनेक संतांनी आपल्या अभंगातून सांगितला आहे. संतांचा विठ्ठल हा भक्तांच्या हृदयात सामावलेला, त्यांच्या भक्ती सुखासाठी तळमळणारा, भक्तांच्या भक्तीने प्रसन्न होऊन त्याची कामे करणारा, जनाईचं जातं फिरवून दळण दळून देणारा, सावता माळ्याचे शेत राखणारा, गोरा कुंभाराची मडकी घडवणारा आणि वर्षानुवर्षे नाथांच्या घरात नोकर म्हणून पाणी वाहणारा असा हा परमेश्वर, पांडुरंग, विठ्ठल म्हणजे भक्ताचा सखा सोयरा, मित्र, भाऊ-बहीण, माता-पिता सर्व काही. त्याला पाहण्यासाठी आषाढी कार्तिकीला संतांनी वारीतून नामस्मरणाचे विठ्ठल महात्म्याचे, क्षेत्र महात्म्याचे महत्त्व समाजासमोर ठेवलं. आपण सारे एक आहोत. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत ही विचारधारा संतांनी वारीतून समाजासमोर ठेवली. केवळ आणि केवळ नामस्मरण करत मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणत पंढरपुरात जाणारा हा वारकरी कशाचीही अपेक्षा न ठेवता निरपेक्ष भावनेने केवळ आणि केवळ या डोळ्यांनी आपल्या प्राणप्रिय पांडुरंगाला पाहाण्याची एकमेव अपेक्षा ठेवतो. अशी अपेक्षा घेऊन संतांनीसुद्धा वारीचे वर्णन आपल्या शब्दात अतिशय सुंदर पद्धतीने केले आहे.

वारकरी तथा भागवत संप्रदायातील थोर संत, विश्व माऊली, कार्यसम्राट अशा संत ज्ञानदेवांनी या वारीचा महिमा आपल्या गोड अशा शब्दातून व्यक्त केला आहे. 'पंढरीचे वाटे अनंत घडती याग.. वैकुंठीचा मार्ग देणे संगे.. जप तप अनुष्ठान क्रिया कर्म धर्म.. हे जाणता ती वर्मा संतजन..



भक्तिमार्ग फुकटा आनंदाची पोहे लागलीसे सवे पुंडलिका.. दिंडी टाळ घोळ गरुड टकियाचे भार.. वैष्णवांचे गजर जय नगरी...' असं म्हणत या वारीचा महिमा व्यक्त केला आहे. क्षेत्र पंढरपुरास निघालेला भाविक मनुष्य नामस्मरण करत वाटेने चालला असता त्याच्या चालण्यामध्ये पावलोपावली यज्ञ घडत असतात व त्या यज्ञापासून होणारी पुण्याई त्यास प्राप्त होते. त्यामुळे वैकुंठप्राप्तीचा मार्ग त्यास सुलभ होतो. जपतप अनुष्ठान क्रिया कर्मधर्म हे सर्व पांडुरंग आहे, असे साधुसंत जाणतात. सत्संगामुळे भक्तिमार्गाची वाट सुरू होते व त्यास ब्रह्मांडप्राप्तीचा सुकाळ होतो. विना टाळ मृदंग गरुड टक्के घेऊ नये... वैष्णवांचा मेळा पंढरपूर क्षेत्रामध्ये आनंदाने भगवंतनामाचा गजर करत असतो. हा आनंद स्वर्गातील इंद्रादिक देवांनाही दुर्लभ आहे. म्हणून हे पंढरपूर क्षेत्रात वृक्ष होऊन राहिलेले आहेत. सहकारी म्हणून पंढरपूर क्षेत्रात ध्यान

करत बसले आहेत. भगवंत नामाचा महिमा ब्रम्हदेवालादेखील कळणे कठीण आहे. अशा माऊलीनी वारीचा एक वेगळा भाव आपल्या शब्दातून व्यक्त केला आहे. संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी या वारीच्या अनुषंगाने नामस्मरणाचे महत्त्व व्यक्त करताना 'घेता नाम विठोबाचे पर्वत जळती पापाचे' असं म्हणत 'नाचू कीर्तनाचे रंगी.. ज्ञानदीप लावू जगी' अशी विचारधारा व्यक्त केली आहे. संत नामदेवांच्या समवेत सर्वच संतांनी हा वारीचा आनंद त्या कालखंडामध्ये संतांच्या समवेत प्रत्यक्ष अनुभवलेला आहे. शांतीब्रह्म एकनाथ महाराजांनी वारीचे महत्त्व व्यक्त करताना साधन ते सारं पंढरीची वारी.. आन न तू करी सायासाचे.. जाऊन या विठ्ठल पहावा डोळा फिटे कर्म मळा जन्मांतरीचा, मन नलगे साधन नाना मंत्र विवेक रामनामे सुख रंगीत जावे, एका जनार्दनी भाव अवघा विठ्ठलची देव... अशा शब्दातून पंढरीच्या वारीचा महिमा व्यक्त केला आहे. या वारीमध्ये वारकरी उच्च-नीच हा भेद विसरून आपण सगळे एक आहोत अशी एकतेची भावना घेऊन पंढरपूरच्या वाटेने विठ्ठल विठ्ठल करत पंढरपूरला पोहोचणारा आहे. आपल्या हृदयात भगवत भक्ती फुलल्यास जन्म जन्म अंतरीची पापे नष्ट होतात हे संत एकनाथ महाराजांनी सांगितले आहे. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ महाराज याबरोबरच वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ असलेले थोर जगतगुरू संत तुकाराम महाराज यांनीसुद्धा वारीचा महिमा, वारीचे वेगळेपण व वारीचा आनंद आपल्या शब्दात व्यक्त केला आहे. रूपी गुंतले लोचन.. पाया स्थिरावले मन.. देह भाव हरपला.. तुझ पाहता विठ्ठला..तान हरपली भूक.. तुका म्हणे नव्हे परती तुझ्या दर्शने मागुती... ही भावना पांडुरंगाच्या चरणी व्यक्त करत वारीमध्ये सहभागी होऊन आता तुझं दर्शन घेतल्याशिवाय परतणार नाही ही दृढभावना संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त होते. होय होय वारकरी. पाहे पाहे रे पंढरी.. काय करावी साधने फळ अवघेची येणे अभिमान नुरे कोण अवघेची पुरे.. तुका म्हणे डोळा विठोबा सावळा- अशा सावळ्या विठ्ठलाला पाहण्यासाठी मनात दृढभाव घेऊन वारकरी पायी चालत चालत पंढरपूर गाठतात. परंपरेत आपल्या अभंग वाणीतून स्वतःचा वेगळा भाव व्यक्त करणारे संत नामदेवांचे शिष्य संत चोखामेळा यांनीसुद्धा या वारीचा सुंदर असा भाव शब्दातून व्यक्त केला आहे. 'जन्माचे साकडे नाही माझे कोडे जेणे तुम्हा पडे देवा कोणत्याही कोळी उंच नीच वर्ण हे माझं कारण नाही त्याचे वैष्णवांचे द्वारे लोळेना पर्वरी करी अधिकारी उच्चिष्टांचा' असं म्हणत सुखा म्हणे जया घडे पंढरीची वारी तयारी पशुपाती- संत चोखामेळ्यांनी पंढरीच्या पांडुरंगाकडे


संघ शताब्दीनिमित्ताने

समिधा

१०१ प्रचारकांच्या जीवनगाथा
प्रचारक म्हणून जगताना भारतमातेच्या चरणी
स्व अर्पण करणाऱ्या असामान्य माणसांच्या गोष्टी.

किंमत ५००/- रु.
सवलत मूल्य
४००/-



**नोंदणीसाठी संपर्क :**

- दयानंद शिवशिवकर : ९५९४९६१८४८
- प्रदीप निकम : ९५९४९६१८५२ • धनाजी जाधव : ९५९४०९३८३४
- राजेश गावडे : ७०४५७८१६८७ • संजय शिवगण : ९५९४९५१८४५
- कार्यालय : ७७३८८४३५३२/ ९५९४९६२३०२

मला पुढचा जन्म उच्च कुळात घाल असे मी म्हणणार नाही, असे सांगतात. मला कुठल्याही कुळात जन्म घाल, पण ते घर मात्र वैष्णवाचे असावे. विष्णू भक्तांच्या घरात मला एकदाच नव्हे तर वारंवार जन्माला घाल, मग मी त्या भक्तांच्या उष्ट्यावरसुद्धा जगेन. पंढरीची वारी करणाऱ्या निष्ठावान घरात मी पशुसारखा जन्मूनही आनंदाने राहील. असा हा वारीचा वेगळा भाव संत चोखामेळा यांनी व्यक्त केला आहे. संत तुकारामांच्या नंतर वारकरी संप्रदायातील संत म्हणून तेवढेच लोकप्रिय ठरलेले संत निळोबाराय यांनीसुद्धा वारीचे वेगळेपण आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे – जे जे येती वारकरी भेटी हरी भावे त्या.. म्हणे माझे अंतरंग आले जिवलग भेटीशी करुनी प्रीतीचा सोहळा अलौकिक डोळा क्षणाक्षणा, निळा म्हणे आवडी ऐसा होऊनी सारीला टाके पुढे– असा वारीचा आनंद व्यक्त केला आहे. पंढरीच्या वारीमध्ये सहभागी होऊन जसा वारकऱ्याला पांडुरंगाला भेटण्याचा एक वेगळा भाव मनात साठलेला असतो तद्वतच तेवढीच ओढ भगवंतालासुद्धा आपल्या प्राणप्रिय भक्ताला भेटीसाठी झालेली असते दमून भागून आनंदात धावत येणाऱ्या भक्तांना वेगाने भेटू देतो असा हा पांडुरंग सर्वांच्या ठायी सर्वांच्या मनात एक आनंद समाधान व सुख देणारा आहे. शांतीब्रम्ह एकनाथ महाराजांचे पणजोबा म्हणजेच संत भानुदास महाराज यांनीसुद्धा या वारीच्या अनुषंगाने भानुदास म्हणे हाची माझा नेम तुझा काही श्रम न करिया न असं म्हणत नित्य पाठच प्रस्तुत केला आहे. संत कुर्मदास यांनीसुद्धा आपल्या ११७ अभंगांपैकी काही अभंगांतून पंढरीच्या वारीचा महिमा व्यक्त केला आहे. आले आले वारकरी.. करती जय जयकार.. गरुड टक्के भारी असंख्यात– असे वर्णन कुर्मदासांनी केले आहे. 'पंढरीच्या वाटे नाही खडा गोटा.. तिथं माझा सखा पांडुरंग' अशी धारणा मनी बाळगून ऊन, वारा, पाऊस अशा सर्वच बाजूला करत वारकरी वारी नियमाने करत असतो. गेल्या शेकडो वर्षांची परंपरा आधुनिक कालखंडातही तेवढ्याच नियमाने.. विश्वासाने व दृढनिश्चयाने नियमन करणारा हा वारकरी महाराष्ट्राचं संचित म्हणावं लागेल. मजल दरमजल करत वारीत सहभागी होत मुखाने माऊली, राम कृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल म्हणणारा वारकरी जेव्हा पंढरी डोळ्यांनी पाहतो. पांडुरंगाला डोळ्यांनी पाहतो तो आनंद संत चोखामेळा यांनी फार सुंदर रीतीने व्यक्त केला आहे. संत चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात, माझा शीन भाग अवघा हरपला.. विठोबादेखील विटेवरी.. तू सुख सोहळा देवांशी दुर्लभ.. आम्हा तो सुलभत चोखा म्हणे असा– अशी वेगळी अनुभूती चोखामेळा यांनी व्यक्त केली आहे. विठ्ठल विठ्ठल गजरी अवघे दुमदुमली पंढरी.. होता नामाचा गजर दिंड्या पथकांचा भार अशी आनंदावस्था लाखो वारकरी वारी करत पंढरीत आल्यानंतरचे वर्णन संत चोखामेळांनी केले आहे. संत नामदेवांची परम शिष्य तथा दासी संत जनाबाई यांनी या अनुषंगाने केलेली रचना निश्चितच मनाला भुरळ घालते, विठू माझा लेकुरवाळा.. संगे गोपाळांचा मेळा.. निवृत्ती हा खांद्यावरी.. सोपानाचा हात धरी.. पुढे चालले ज्ञानेश्वर.. मागे मुक्ताई सुंदर.. गोरा कुंभार मांडीवरी.. चोखा जीवा बरोबरी.. बंका कडीयेवरी.. नामा करांगुळी धरी.. जनी म्हणे गोपाळा.. करी भक्तांचा सोहळा.. या प्रसिद्ध अशा अभंगातून संतांची वारी प्रत्यक्ष पांडुरंगाच्या सोबत कशी होती ही भावावस्था संत जनाबाई यांनी अभंगातून व्यक्त केली आहे. विठ्ठल भक्तीचा हा प्रवाह प्रांत, भाषा याच्या दूर जाऊन सर्वतोपरी विठ्ठलभक्ती पेरणारा आहे. नामस्मरणाचे महत्त्व विठ्ठलाचे महत्त्व सर्वदूर पसरलेले आहे. परप्रांतातही भक्तीतून ईश्वराचा विचार व्यक्त करणारे संत कबीरदास यांनीसुद्धा वारीचा आनंद आपल्या शब्दातून व्यक्त केला आहे. सब आलम का रखने वाला विठ्ठल पंढरपूर वाला.. फकीर उनोके खूब मिराजे सब संतन का मेला.. निशान झेंडा दीये डेरे चंद्रभागामे हुआ मेला.. आखाडी एकादशीसे कबीर भगत हुआ चेला– या हिंदी रचनेतून पंढरीचा वारीचा महिमा व विठ्ठलाची भक्ती संत कबिरांनी व्यक्त केली आहे. संत नामदेव या वारकऱ्यांकडे पाहून आपल्या एका अभंगात म्हणतात– आले आले रे हरीचे डिंगर.. वरी वारी कर पंढरीची अशी धारणा व भावना व्यक्त केली आहे. या व अशा महान संत विभूतींनी वारीचा आनंद, वारीचा सोहळा, वारीचा महिमा, वारीचे गुणगान आणि वारीची अनुभूती आपापल्या परीने शब्दात व्यक्त केली आहे. वारी करि तो वारकरी.. याप्रमाणे शेकडो वर्षांची ही वारीची परंपरा नेमाने, निष्ठेने, नियमितपणे व निश्चयाने सांभाळत आलेल्या सगळ्या कष्टाला, संकटाला दूर करत हा वारकरी आषाढी–कार्तिकी वारीत सहभागी होतो आणि आनंदाचे डोही आनंद तरंग याप्रमाणे त्यात सहभागी होतो. संतांप्रमाणे आपल्यालाही वारीचा आनंद मिळावा एकदा तरी आपण या वारीमध्ये सहभागी व्हावे आणि वारीचा आनंद.. पंढरीचा आनंद.. पांडुरंगाच्या दर्शनाचा आनंद आपल्यालाही प्राप्त व्हावा ही माऊली चरणी प्रार्थना.. रामकृष्ण हरी!

मराठी विभागप्रमुख. (प्राध्यापक)
सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालय किनवट,
ता. किनवट, जि. नांदेड. मोबा.




# महाराष्ट्राची वारी परंपरा : भक्ती, समता आणि श्रद्धेचा अखंड प्रवाह

**आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर लाखो वारकरी पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराकडे पायी चालत जातात. ही परंपरा सातशे-आठशे वर्षांहून अधिक काळ अखंडपणे सुरू आहे. जगातील सर्वांत मोठ्या आणि सर्वांत जुन्या सामूहिक पायी यात्रांपैकी ही एक मानली जाते. दरवर्षी सुमारे दहा ते वीस लाख वारकरी या यात्रेत सहभागी होतात, आणि हा आकडा सतत वाढत आहे.**

**प्रा. डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी**
९४२२४९५०९४

आषाढी कार्तिकी विसरू नका मज ।
सांगतसे गुज पांडुरंग ।। १ ।।
पतितपावन मी तो आहे खरा ।
तुमचेनि बरा दिसतसे ।। २ ।।
तुम्ही जाता गावा हुरहूर माझे जीवा ।
भेटाल केधवा मजलागी ।। ३ ।।
धावोनिया देव गळा घाली मिठी ।
स्फुंदस्फुंदून गोष्टी बोलतसे ।। ४ ।।
तिही त्रिभुवनी मज नाही कोणी ।
म्हणे चक्रपाणी नामयासी ।। ५ ।।

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनात 'वारी' या शब्दाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'वारकरी' शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ सांगताना असे लक्षात येते की 'वारी' म्हणजे ठरावीक वेळी केलेली यात्रा किंवा प्रवाशांची टोळी होय. इतिहासकार कै. वि. का. राजवाडे यांच्या मते, 'वारिः – री' म्हणजे प्रवाशांची टोळी. यावरूनच 'वारी' हा शब्द रूढ झाला. जो नियमाने ही वारी करतो, तो 'वारकरी.' या शब्दाच्या विशिष्ट अर्थाचा विचार केला तर महाराष्ट्रात जेजुरी किंवा गाणगापूरसारख्या इतर तीर्थक्षेत्री नियमाने जाणाऱ्यांसाठी व्यापक अर्थाने हा शब्द वापरता येत असला, तरी ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रवासात या शब्दाला एक विशिष्ट अनन्यसाधारण अर्थ प्राप्त झाला आहे. 'वारकरी' म्हटला की तो केवळ आणि केवळ 'पंढरपूरचा वारकरी' असाच अर्थ घेतला जातो आणि हा समज सर्वस्वी योग्य आहे. वारकरी भक्ताची अंतर्बाह्य लक्षणे पाहता, संत ज्ञानदेव आणि



संत नामदेव यांनी आपल्या अभंगांमधून 'वारीकर' या शब्दाचा गौरव केला आहे. संतांच्या वाङ्मयानुसार वारकऱ्याची बाह्य लक्षणे म्हणजे गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गोपीचंदनाचा टिळा (उटी), हाती शंख-चक्रादी शृंगार, गरुडटका आणि मोरपिसांचा कुंचा घेऊन मुखाने विठ्ठलनामाचा गजर करत निष्ठेने पंढरीची वारी करणे ही होत. तर अंतर्लक्षणे अशी की, केवळ बाह्य वेशापेक्षा वारकऱ्याचे अंतःकरण महत्त्वाचे असते. त्याच्या मनात तीव्र वैराग्य असते, ज्यामुळे काम-क्रोधादी षड्विकारांना जिंकण्याचे सामर्थ्य त्याला लाभते. त्याच्या ठायी दया, क्षमा आणि शांती या सद्गुणांची संपन्नता असते. त्याचे हृदय सदैव भक्ती आणि प्रेमाच्या रसाने रसरसलेले असते आणि हा आनंद त्याच्या सर्व इंद्रियांतून ओसंडून वाहत असतो.

आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर लाखो वारकरी पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराकडे पायी चालत जातात. ही परंपरा सातशे-आठशे वर्षांहून अधिक काळ अखंडपणे सुरू आहे. जगातील सर्वांत मोठ्या आणि सर्वांत जुन्या सामूहिक पायी यात्रांपैकी ही एक मानली जाते. दरवर्षी सुमारे दहा ते वीस लाख वारकरी या यात्रेत सहभागी होतात, आणि हा आकडा सतत वाढत आहे.

**पंढरपूर आणि विठ्ठल दैवताची प्राचीनता**

पंढरपूर आणि विठ्ठल दैवताची प्राचीनता अभ्यासताना समजते की, ज्ञानेश्वरपूर्व काळातही विठ्ठल हे दैवत अत्यंत लोकप्रिय, प्रसिद्ध आणि सर्वमान्य होते, याचे अनेक ऐतिहासिक, पुरातात्त्विक आणि साहित्यिक पुरावे मिळतात. आद्य शंकराचार्य (८ वे शतक) यांच्या काळाचा विचार केला तर शृंगेरीमठाने अधिकृत मानलेल्या आद्य शंकराचार्यांच्या प्रसिद्ध 'पांडुरंगस्तोत्रा'त (महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुंडरीकाय दातुं...) पांडुरंग आणि पुंडलिक यांचा स्पष्ट उल्लेख येतो. यावरून ८ व्या शतकात विठ्ठलभक्ती पूर्ण वैभवात होती हे सिद्ध होते. तसेच पंढरपूरच्या अस्तित्वाचा सर्वात जुना लेख राष्ट्रकूट ताम्रपट (इ.स. ५१६) चा असून तो म्हैसूर सरकारच्या पुराभिलेख (Archaeology) खात्याच्या १९२९ च्या अहवालात मिळतो. या ५१६ च्या ताम्रपटात राष्ट्रकूट राजा मानाङ्क याने 'जयद्विट्ठ' नावाच्या ब्राह्मणाला 'पांडुरंगपल्ली' (हल्लीचे पंढरपूर) या गावांसह इतर गावे दान दिल्याचा उल्लेख आहे. शिलालेखीय पुरावे व लोकमान्यता पाहता होयसळ राजे आणि देवगिरीचे यादव राजे यांच्या काळात विठ्ठलाला मोठ्या प्रमाणावर देणग्या व दाने दिली जात होती. इ.स. १२१४ च्या शिमोगा येथील एका लेखात विठ्ठलेशास दान दिल्याची नोंद आहे. तसेच, प्राचीन काळापासून आपल्या मुलांची नावे 'विठ्ठल', 'विठ्ठद्विज', 'विठ्ठपय्या' किंवा 'विठ्ठरस' ठेवण्याची पद्धत जुन्या काळापासून चालत आली होती. संत ज्ञानदेवांच्या वडिलांचे नावही 'विठ्ठलपंत' होते, जे या लोकप्रियतेचे प्रतीक आहे.

**वारीचा ऐतिहासिक उगम**

वारीच्या प्रथेचा इतिहास आणि प्राचीनता लक्षात घेता, वारीची प्रथा नेमकी कोणी सुरू केली याची निश्चित माहिती



उपलब्ध नसली, तरी ती ज्ञानेश्वरांच्या जन्मापूर्वी कित्येक वर्षे आधीपासून चालू होती याला भक्कम पुरावे आहेत. इ.स. १२४८ चा कानडी शिलालेख जो धारवाडजवळील हेळ्ळी गावी देवगिरीचा यादव राजा कन्हर (कृष्ण) याच्या काळातील आहे. त्या लेखात पंढरपूरच्या विठ्ठलदेवाच्या वारीच्या हरिदिनी (एकादशीला) अन्नदान किंवा धर्माचे काम करण्यासाठी 'कलुवर सिंग गाउंड' याने जमीन किंवा उत्पन्नाची व्यवस्था (वृत्ती) करून दिल्याची स्पष्ट नोंद आहे. हा लेख ज्ञानेश्वरांच्या जन्माच्या २७ वर्षे आधीचा आहे. संतांचे साक्षित्व तपासले तर संत नामदेवांच्या गाथेतील उल्लेखांनुसार, ज्ञानेश्वरांचे आजे सिधोपंत यांनी विठ्ठलपंत व रुक्मिणी यांच्या विवाहानंतर त्यांना कुलदैवत विठ्ठलाच्या दर्शनास नेले होते, तेव्हा पंढरपुरात मोठी यात्रा भरली होती. संत ज्ञानेश्वर महाराजांचे वडील विठ्ठलपंत हे नियमितपणे पंढरपूरला जात असत, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. यावरूनच वारीच्या प्रथेचा प्रारंभ झाला असे मानले जाते. परंतु ज्ञानेश्वर महाराजांच्याही आधीपासून विठ्ठलभक्त पंढरपूरला जात असल्याचे उल्लेख आढळतात. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथांतून भागवत धर्माचा पाया घातला आणि त्यांच्यामुळेच वारकरी संप्रदायाला एक सुसंघटित तात्त्विक अधिष्ठान मिळाले.

पुढे सतराव्या शतकात संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून विठ्ठल भक्तीचा प्रसार अधिक व्यापक केला. सर्वसामान्य जनतेच्या भाषेत, त्यांच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन तुकाराम महाराजांनी भक्तीचा सोपा मार्ग दाखवला.

या संपूर्ण जडणघडणीचे अत्यंत सुंदर आणि मार्मिक वर्णन संत बहिणाबाईंनी आपल्या एका प्रसिद्ध अभंगात केले आहे–

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करां सावकाश ।।
बहिणी म्हणे फडकतो ध्वजा । निरूपणा केलें बोजा ।।

संत तुकारामांचे धाकटे पुत्र नारायण महाराज यांनी इसवी सन १६८५ मध्ये संतांच्या पादुका पालखीत ठेवून पंढरपूरला नेण्याची प्रथा सुरू केली. ही घटना वारीच्या संघटित स्वरूपाची खरी सुरुवात मानली जाते.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला हैबतराव बाबा आरफळकर यांनी या यात्रेला सध्याचे शिस्तबद्ध स्वरूप दिले. हैबतराव बाबा हे शिंदे सरकारच्या पदरी असलेले एक सरदार होते आणि ते संत ज्ञानेश्वरांचे निस्सीम भक्त होते. त्यांनी दिंड्यांची रचना, ठराविक वेळापत्रक, अश्वांचा सहभाग आणि मिरवणुकीची लष्करी शिस्त यांसारखे बदल घडवून आणले. त्यांच्यामुळेच आजची वारी एका सुव्यवस्थित, वेळापत्रकबद्ध यात्रेत रूपांतरित झाली.

सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग,
गुजरात केंद्रीय विद्यापीठ, वडोदरा




# वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्।

**इंग्रज सरकारने हिंदू-मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याच्या कुटिल हेतूने २० जुलै १९०५ रोजी बंगालच्या फाळणीचा सरकारी आदेश जाहीर केला. १६ ऑक्टोबर १९०५ रोजी बंगालची फाळणी झाली. या फाळणीला मुस्लिम नागरिकांचा पाठिंबा होता. ज्या दिवशी बंगालच्या फाळणीची घोषणा इंग्रजांनी केली, त्याच दिवशी कलकत्तावासीयांनी हरताळ पाळला होता. त्यावेळी कलकत्त्याच्या कानाकोपऱ्यातून 'वंदे मातरम्'चा जयघोष झाला होता. या दिवसापासून 'वंदे मातरम्'ला खऱ्या अर्थाने राष्ट्रीय मंत्राचे पावित्र्य प्राप्त झाले.**

**प्रा. डॉ. श्री. लक्ष्मण ढवळू टोपले**

८३९०३१२१२८

आपले भारतवर्ष ही एक प्राचीन धर्मभूमी आहे. धर्म, तत्त्वज्ञान किंबहुना सर्व शास्त्रांचा मूल स्रोत आपली भारत भूमीच आहे. समुद्राच्या उत्तरेला आणि हिमालयाच्या दक्षिणेला असलेल्या पृथ्वीच्या भूभागाला भारत देश आणि या देशातील संततीला भारतीय संबोधले जाते. आपले भाग्य थोर म्हणून आपण या पुण्यभूमीत जन्माला आलो. आपल्या भारतवर्षाची संस्कृती अतिशय प्राचीन आणि अभिमान बाळगावी अशीच आहे.

प्रभु श्रीरामचंद्र आपला बंधू लक्ष्मणाला आपल्या मायभूमीची महती सांगताना म्हणतात, 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।' आपली स्वत:ची आई आणि मायभूमी या स्वर्गाहून श्रेष्ठ आहेत. या त्यांच्या वचनावरून भारतमाता, जन्मभूमी, मातृभूमी या कल्पना अगदी प्राचीन काळापासून आपल्या जनमानसात प्रचलित आहेत. ही कल्पना श्रद्धेच्या आणि आदर्शाच्या रूपाने भारतवासीयांच्या मनात परंपरागतरीत्या रुजलेली असून त्याचे प्रकटीकरण या ना त्या रूपाने होत आलेले आहे.

आणि याच प्रखर देशभक्तीचे, आदर्शाचे दर्शन आणि प्रकटीकरण, विख्यात आणि अजरामर असलेल्या 'वंदे मातरम्' या गीतातून झाल्याचे आपल्या अनुभवाला येत असते.

या महान 'वंदे मातरम्' गीताचा जन्म दि. ७ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला. बंगालमधील प्रख्यात राष्ट्रवादी साहित्यिक बंकिमचंद्र चटर्जी उपाख्य चटोपाध्याय यांनी हे गीत लिहिलेले आहे.




'वंदे मातरम्' हे गीत कोणा देवाचे, धर्माचे गुणगान करणारे गीत नाही, तर हे गीत आपल्या मातृभूमीला वंदन करणारे गीत आहे. अवघ्या देशालाच मातृदेवता मानून मातृभूमीचे पांग फेडण्यासाठी त्यांनी हे गीत लिहिले.

सन १८८२ मध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी त्यांच्या या गीताचा अंतर्भाव त्यांच्या 'आनंदमठ' कादंबरीत केला. ही कादंबरी अठराव्या शतकातील बंगालमध्ये काही संन्याशांनी इंग्रज व मुस्लिम नबाबाविरुद्ध केलेल्या बंडाची व युद्धाची कथा सांगते. प्रख्यात संशोधक डॉ. विमान विहारी मुजुमदार म्हणतात, 'आनंदमठ कादंबरीतील घटना आणि क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या इतिहासात साम्य आहे. फडक्यांनी दिलेला लढ्याने 'आनंदमठ'साठी प्रेरणा मिळाली असणे शक्य आहे.

या कादंबरीतील 'वंदे मातरम्' हे गीत गाणारा भिवानंद आश्चर्यचकित झालेल्या महेंद्रसिंहाला म्हणतो, 'आमची मातृभूमी हीच आमची 'मातरम्' आहे.' कादंबरीतील एक भिवानंद 'वंदे' असे म्हणतो तर धीरानंद त्याला 'मातरम्' असे म्हणून प्रतिसाद देतो आणि हे संन्यासी 'वंदे मातरम्' घोषणा देत मृत्यूला सामोरे जातात, असा या कथेचा शेवट केला आहे.

'आनंदमठ' कादंबरीच्या कर्त्याचे, अर्थात बंकिमचंद्र चटर्जी यांचे वर्णन योगी अरविंद यांनी 'एकोणिसाव्या शतकातील हिंदुस्थानातील सर्वात मोठा साहित्यिक प्रज्ञावंत' असे केले आहे. तर त्यांच्या वंदे मातरम् गीताबद्दल योगी अरविंदांनी 'एका दिवसात अवघ्या देशवासीयांना राष्ट्रधर्माची दीक्षा देणारा मंत्र' या शब्दात व्याख्या केली आहे.

'आनंदमठ'ने एक नये युग की शुरवात की थी' इस अपने लेख में डॉ. वीरेंद्र शर्मा लिखिते है, 'समस्त भारतीय जनमानस को आन्दोलित करने वाली उनकी कालजयी कृति 'आनंदमठ' एक उदात्त सन्देशवाहक प्रेरणादायक उपन्यास है। इस रचना का प्रकाशन आज से एक शती पूर्व सन १८८२ इ.स. मे हुआ था।' डॉ. वीरेंद्र शर्मा आगे लिखिते है कि, इसमें भारत की जननी के रूप में परिकल्पना प्रस्तुत की गयी है।

'वंदे मातरम्' गीत के बारे में वे लिखिते है, 'भारत का राष्ट्रगीत वंदे मातरम् इसी उपन्यास में आया है. राष्ट्रीय मुक्ति आंदोलन के दौरान भारतीयों को प्रेरित करने में इस गीत की महत्त्वपूर्ण भूमिका सर्व विदित है।'

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळात 'वंदे मातरम्' या गीताबद्दल 'वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्' अशी देशभक्तांची, क्रांतिकारकांची, स्वातंत्र्य सैनिकांची भावना होती. 'वंदे मातरम' हा क्रांतिकारकांचा मूलमंत्र होता. या दोन शब्दामुळेच शेकडो क्रांतिकारकांना इंग्रजांविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. 'वंदे मातरम्'चा जयघोष करीत अनेक वीरांनी हौतात्म्य पत्करले.

'वंदे मातरम्'ची ताकद वर्णन करताना अमरेंद्र गाडगीळ यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे, 'वंदे मातरम्'च्या उच्चारात डोक्यावर पडणारे लाठ्यांचे तडाखे नि उघड्या अंगावर बसणारे फटके हे सहन करण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले.

इंग्रज सरकारने हिंदू-मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याच्या कुटिल हेतूने २० जुलै १९०५ रोजी बंगालच्या फाळणीचा सरकारी आदेश जाहीर केला. १६ ऑक्टोबर १९०५ रोजी बंगालची फाळणी झाली. या फाळणीला मुस्लिम नागरिकांचा पाठिंबा होता. ज्या दिवशी बंगालच्या फाळणीची घोषणा इंग्रजांनी केली, त्याच दिवशी कलकत्तावासीयांनी हरताळ पाळला होता. त्यावेळी कलकत्त्याच्या कानाकोपऱ्यातून 'वंदे मातरम्'चा जयघोष झाला होता. या दिवसापासून 'वंदे मातरम्'ला खऱ्या अर्थाने राष्ट्रीय मंत्राचे पावित्र्य प्राप्त झाले.

सन १९०५ पासून सन १९४८ पर्यंत देशाच्या कानाकोपऱ्यात झालेल्या स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत 'वंदे मातरम्'ला अग्रपूजेचा मान मिळाला.

सार्वजनिक सभा असो, कुणाची जयंती, अथक पुण्यतिथी, प्रत्येक कार्यक्रम पत्रिकेवर सुरुवातीला 'वंदे मातरम्' ही अक्षरे असायचीच. कार्यक्रमात 'वंदे मातरम्' गायले जायचे.

हिंदुस्थानात तेव्हा 'वंदे मातरम्' या नावाने हिंदी, इंग्रजी, बंगाली आदी भाषांतून दैनिके, साप्ताहिके, प्रकाशित होत होती. लाला हरदयाळ यांनी तर स्वित्झर्लंडहून 'वंदे मातरम्' नावाचे इंग्रजी दैनिक सुरू केले होते.

१९०८ मध्ये जर्मनीतील स्टटगार्ड येथे इंटरनॅशनल सोशॉलिस्ट काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्यावेळी मॅडम कामा यांनी हिंदुस्थानचा स्वतंत्र्य राष्ट्रध्वज फडकवला. त्यावर 'वंदे मातरम्' ही अक्षरे ठळकपणे लिहिली होती.

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले, त्या दिवशी म्हणजे दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी सकाळी ओंकारनाथ ठाकूर यांनी 'वंदे मातरम्' गीत गायले. आजही आकाशवाणीची (आता प्रसारभारतीची) पहिली सभा सकाळी 'वंदे मातरम्' गीताने सुरू होते.

अर्थात, त्याचे सारे श्रेय मास्टर कृष्णराव यांना आहे.

त्यांनी 'झिंझोटी' रागावर आधारित 'वंदे मातरम्'ला सुरेल चाल लावली होती. 'वंदे मातरम्'चे मास्टरांनी चाल लावलेले ध्वनिमुद्रण स्वतः व्ही. शांताराम यांनी १९३८ मध्ये करून घेतले होते.

१८९३ मध्ये कवीवर्य रवींद्रनाथ टागोर यांनी हे गीत कोलकाता काँग्रेसमध्ये स्वत: म्हटले होते. त्याची चालही त्यांनी स्वत: 'देश' रागात बसवली होती. १९०५ च्या बनारस काँग्रेस अधिवेशनात अध्यक्ष नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी केलेल्या विनंतीनुसार सरला देवी चौपरानी ('चौपुराणी' रवींद्रनाथांची भाची) यांनी हे गीत मधुर स्वरात गायले होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र झाला. या स्फूर्तिगीताला राष्ट्रगीताचे स्थान मिळेल अशी अपेक्षा लोकांनी केली. पण 'वंदे मातरम्' बॅण्डवर वाजवता येत नाही, ते क्लिष्ट आहे अशा कारणावरून त्याला प्रथम राष्ट्रगीताचा मान मिळला नाही. तो 'जन-गण-मन' या गीताला मिळाला. २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी अध्यक्षस्थानावरून ठराव मांडला की, 'वंदे मातरम्' या गीतालाही 'जन-गण-मन' गीताएवढाच बहुमान मिळावा. हा ठराव एकमताने मंजूर झाला. त्यानंतर जन-गण-मन' आणि 'वंदे मातरम्' या दोन्ही गीतांचे गायन झाले आणि बैठक संपली.

आज मितीला 'वंदे मातरम्' या गीताला 'जन-गण-मन' या गीताइतकाच बहुमान आहे आणि 'वंदे मातरम्' हे गीत भारतीय जनतेच्या हृदयात आणि मनात मानाचे स्थान राखून आहे.







# गरिबी : अभाव नव्हे, तर संघर्षातून घडणाऱ्या माणुसकीची शाळा

**भूक ही केवळ पोटाची गरज नसून ती मानवी अस्तित्व, सन्मान आणि विकासाशी निगडित आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला दोन वेळचे पुरेसे अन्न मिळत नाही, तेव्हा त्याच्या आयुष्यातील इतर सर्व गरजा दुय्यम ठरतात. त्यामुळे भूक हे गरिबीचे सर्वात ठळक आणि वेदनादायी रूप आहे. भुकेमुळे माणूस शिक्षणापासून दूर जातो, आरोग्य खालावते, श्रमशक्ती कमी होते आणि रोजगाराच्या संधीही मर्यादित होतात. उपासमार आणि कुपोषणामुळे गरीब कुटुंबातील मुले शारीरिक व बौद्धिक विकासात मागे पडतात. परिणामी गरिबीचे दुष्टचक्र एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालू राहते. गरिबीचे मूळ केवळ अन्नटंचाईत नाही, तर अन्न मिळविण्याच्या साधनांच्या अभावात आहे.**


**डॉ. धनंजय भिसे**

९८२२५०८४९२

गरिबी ही केवळ उत्पन्नाचा किंवा पैशांचा अभाव नसून मानवी जीवनातील मूलभूत गरजा अपूर्ण राहण्याची वेदनादायी अवस्था आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार यांपासून जेव्हा एखादी व्यक्ती किंवा कुटुंब वंचित राहते, तेव्हा त्या अवस्थेला 'गरिबी' म्हणतात. त्यामुळे गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विषमतेचेही जिवंत प्रतिबिंब आहे. गरिबीच्या कुशीत वाढणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वात दोन परस्परविरोधी भासणारे, पण तितकेच सामर्थ्यवान गुण एकाच वेळी विकसित होत असतात. ते म्हणजे विनम्रता आणि विद्रोह हे होय. विनम्रता त्याला प्रतिकूल परिस्थितीत संयमाने जगण्याची, माणुसकी जपण्याची आणि कष्टाची किंमत समजून घेण्याची शिकवण देते; तर विद्रोह त्याच्या अंतःकरणात अन्याय, शोषण, विषमता आणि अपमानाविरुद्ध उभे राहण्याची ताकद निर्माण करतो. हा विद्रोह विध्वंसाचा नसतो, तर स्वाभिमानाचा, न्यायाचा आणि परिवर्तनाचा असतो. म्हणूनच गरिबी माणसाला केवळ मोडत नाही; ती त्याला घडवते, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला धार देते आणि समाजपरिवर्तनाची जिद्द त्याच्या मनात जागवते. 'काठीकार' विजयकुमार सूर्यवंशी यांचे 'गरिबी' हे पुस्तक वाचताना ही जाणीव प्रकर्षाने होते. म्हणूनच गरिबी ही केवळ अभावांची कहाणी नसून संघर्ष, स्वाभिमान, जिद्द आणि आत्मविकासाची एक जीवनशाळा आहे. या पुस्तकातील अनुभव वाचकाला केवळ भावनिक करत नाहीत, तर समाजातील विषमता, भूक, अन्याय आणि मानवी अस्तित्वाच्या प्रश्नांवर गंभीरपणे विचार करण्यास भाग

पाडतात.

महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत असलेले विजयकुमार सूर्यवंशी मराठी साहित्यविश्वात 'काठीकार' म्हणून विशेष ओळख निर्माण करतात. त्यांच्या 'काठी' (२००६) या आत्मकथनाने साहित्यविश्वात व्यापक चर्चा घडवून आणली. परिस्थितीने त्यांच्या हातात बालपणी गुराख्याची काठी दिली; उदरनिर्वाहासाठी हलगीची काठीही हातात घ्यावी लागली. परंतु शिक्षणावरील अढळ विश्वास, अथक परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी त्या काठीचे रूपांतर पोलीस शिपायाच्या काठीत केले. ही काठी केवळ पोलीस खात्याची ओळख राहिली नाही; ती त्यांच्या संघर्षाची साक्षीदार ठरली, त्यांच्या कुटुंबाच्या उन्नतीचा आधारस्तंभ बनली आणि जीवनाच्या पवित्र 'कावड'प्रमाणे जबाबदारी, कर्तव्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक ठरली. म्हणूनच विजयकुमार सूर्यवंशी यांचा सामाजिक व वाङ्मयीन जीवनप्रवास हा केवळ एका व्यक्तीच्या यशाचा इतिहास नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभ्या राहिलेल्या संघर्षशील माणसाच्या अदम्य इच्छाशक्तीचा प्रेरणादायी दस्तऐवज आहे.




मराठी साहित्यात सामाजिक वास्तव मांडणाऱ्या पुस्तकांची एक समृद्ध परंपरा आहे. त्या परंपरेत विजयकुमार सूर्यवंशी लिखित 'गरिबी' हे पुस्तक स्वतःच्या अनुभवातून समाजातील दारिद्र्य, विषमता, अन्याय आणि संविधानिक मूल्यांचा शोध घेणारे चिंतनपर लेखन म्हणून लक्ष वेधून घेते.

लेखकाने स्वतः अनुभवलेल्या अत्यंत कठीण परिस्थितीचे, उपासमारीचे, सामाजिक उपेक्षेचे आणि संघर्षमय जीवनाचे केलेले वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी आहे. हे अनुभव कृत्रिम वाटत नाहीत; उलट ते वाचकाला अंतर्मुख करायला लावणारे आहे. पुस्तकातील एक एक लेख हा वाचकांवर प्रभाव टाकणारा आहे.

भारतातील गरिबीची कारणे अनेक आहेत. लोकसंख्येची वाढ, बेरोजगारी, अशिक्षितपणा, जमिनीचे असमान वाटप, संसाधनांचे केंद्रीकरण, भ्रष्टाचार, सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि विकासाच्या संधींमध्ये असलेली असमानता ही त्यांपैकी प्रमुख कारणे आहेत. ग्रामीण भागात शेतीवरील अवलंबित्व, नैसर्गिक आपत्ती आणि अपुरे औद्योगिकीकरण यांमुळे गरिबी अधिक तीव्र स्वरूपात दिसून येते.

गरिबीचा सर्वाधिक परिणाम शिक्षण, आरोग्य आणि मानवी विकासावर होतो. गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते, कुपोषण वाढते, आरोग्यसेवा मिळत नाही, बेरोजगारी वाढते आणि पुढील पिढ्याही दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकतात. त्यामुळे गरिबी ही केवळ आर्थिक नसून सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेशी निगडित समस्या आहे.

भारतीय राज्यघटनेने समता, सामाजिक न्याय आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी, रोजगार, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे गरिबी निर्मूलनासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसून गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती, आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, महिला सक्षमीकरण आणि संसाधनांचे न्याय्य वितरण यांवर भर देणे आवश्यक आहे.त्याचबरोबर बंधुता ही महत्त्वाची आहे.

गरिबीविरुद्धचा लढा हा केवळ शासनाचा नाही, तर संपूर्ण समाजाचा आहे. समाजातील प्रत्येक घटकाने सामाजिक संवेदनशीलता, समता आणि बंधुभाव या संविधानिक मूल्यांचा स्वीकार करून दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला, तरच खऱ्या अर्थाने गरिबीमुक्त आणि समताधिष्ठित भारताची निर्मिती होऊ शकेल.

अशाप्रकारे, गरिबी ही मानवी विकासातील सर्वात मोठी अडचण असून तिचे निर्मूलन हे सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

गरिबीच्या मुळाशी भूक आहे हे विधान मानवी जीवनातील एक कटू वास्तव अधोरेखित करणारे आहे. भूक ही केवळ पोटाची गरज नसून ती मानवी अस्तित्व, सन्मान आणि विकासाशी निगडित आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला दोन वेळचे पुरेसे अन्न मिळत नाही, तेव्हा त्याच्या आयुष्यातील इतर सर्व गरजा दुय्यम ठरतात. त्यामुळे भूक हे गरिबीचे

सर्वात ठळक आणि वेदनादायी रूप आहे. भुकेमुळे माणूस शिक्षणापासून दूर जातो, आरोग्य खालावते, श्रमशक्ती कमी होते आणि रोजगाराच्या संधीही मर्यादित होतात. उपासमार आणि कुपोषणामुळे गरीब कुटुंबातील मुले शारीरिक व बौद्धिक विकासात मागे पडतात. परिणामी गरिबीचे दुष्टचक्र एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालू राहते. गरिबीचे मूळ केवळ अन्नटंचाईत नाही, तर अन्न मिळविण्याच्या साधनांच्या अभावात आहे.

सरोजगार, उत्पन्न, जमीन, शिक्षण, कौशल्य आणि सामाजिक संधी यांचा अभाव माणसाला भुकेकडे ढकलतो. म्हणूनच भूक ही गरिबीची अभिव्यक्ती आहे आणि गरिबीचे निर्मूलन करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने उपजीविका करण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अन्न हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही समाजात एक जरी व्यक्ती उपाशी राहत असेल, तर त्या समाजाच्या विकासाला पूर्णत्व आले आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे भूकमुक्त समाजाची निर्मिती ही गरिबी निर्मूलनाची पहिली अट आहे.

म्हणूनच, गरिबीच्या मुळाशी भूक आहे हे विधान केवळ भावनिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि मानवी विकासाच्या दृष्टीने अत्यंत अर्थपूर्ण आहे. भूक संपली तर गरिबीविरुद्धच्या लढ्याला खरी दिशा मिळेल आणि समताधिष्ठित, सन्मानपूर्ण समाजव्यवस्थेची उभारणी शक्य होईल.


भूक ही शाश्वत आहे. ती डावीही नसते आणि उजवीही नसते; ती फक्त भूक असते. तिचा कोणताही पक्ष, पंथ, जात किंवा धर्म नसतो. उपाशी पोटाला विचारसरणी समजत नाही, त्याला फक्त अन्न हवे असते. म्हणून भूक ही राजकारणाचा विषय नसून मानवतेचा विषय आहे. जोपर्यंत एका माणसालाही उपाशी झोपावे लागते, तोपर्यंत कोणतीही विचारसरणी पूर्णत्वाला पोहोचू शकत नाही. भुकेची भाषा एकच असते आणि तिचे उत्तरही एकच अन्न, सन्मान आणि जगण्याचा अधिकार. प्रस्तुत पुस्तकात दारिद्र्याची व्याख्या, त्याची कारणे, भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक न्याय, शिक्षण, भूमिहीनता, भ्रष्टाचार, शेतकरी, दलित समाज आणि शासनव्यवस्था यांवर लेखकाने स्पष्ट भूमिका मांडली आहे. अनुक्रमणिकेवरूनच पुस्तकाची विषयव्याप्ती व्यापक असल्याचे दिसते.

लेखकाची भाषा साधी, सरळ, प्रवाही आणि जनसामान्यांना समजणारी आहे. त्यामुळे पुस्तक केवळ अभ्यासकांसाठी नव्हे, तर सर्वसामान्य वाचकांसाठीही सहज वाचनीय ठरते. पुस्तकात साहित्यिक अलंकारांपेक्षा वास्तववादी मांडणीला लेखक सूर्यवंशी यांनी अधिक महत्त्व दिले आहे.

पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने दारिद्र्याकडे केवळ आर्थिक समस्या म्हणून न पाहता, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भात त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हे पुस्तक सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारे ठरते. एकंदरीत, 'गरिबी' हे पुस्तक केवळ दारिद्र्याचे वर्णन करत नाही, तर सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव करून देते. स्वतःच्या जीवनसंघर्षातून समाजाला प्रश्न विचारण्याचे धैर्य विजयकुमार सूर्यवंशी यांनी दाखविले आहे. त्यामुळे हा ग्रंथ सामाजिक भान असलेल्या प्रत्येक वाचकाने वाचावा असा आहे.

'गरिबी' हा अनुभव, विचार आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम असलेला प्रभावी ग्रंथ असून सामाजिक परिवर्तनाच्या साहित्यामध्ये त्याचे महत्त्वपूर्ण स्थान निश्चितच करता येण्यासारखे आहे.

संस्थापक/अध्यक्ष :
मातंग साहित्य परिषद, पुणे






# प्रेरणादायी 'संवाद भूषण'

**बिकट अशा आर्थिक, कौटुंबिक, भावनिक परिस्थितीचा मनावर होत गेलेला परिणाम, त्यामुळे येत गेलेले नैराश्य, वैफल्य, ज्यांच्याकडून अपेक्षा होत्या त्यांच्याकडून झालेला अपेक्षाभंग आदींमुळे स्वतःची स्वतःला वाट शोधत राहावी लागली. यातूनच माणसाच्या परिस्थितीपेक्षा त्याची मनः स्थिती महत्त्वाची असते हे उमगले. म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेल्या आणि इतरांनाही यशस्वी होण्यासाठी मदतीचा हात देणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी जीवनकथा लिहिण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.**

**शेषराव वानखेडे**


९८६९४८४८००

अनेकजण विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांतून, तर कधी समक्ष समाजाशी संवाद साधून जनजागृती करीत असतात. निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी त्यांच्या 'संवाद भूषण' या पुस्तकात अशा ३४ व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेतला, ज्यांनी अनेक खस्ता खात, कडूगोड अनुभव घेत आपले आणि आपल्या बरोबर इतरांचेही जीवन समृद्ध केले आहे.

केवळ ओळखीचा आहे म्हणून त्याच्याबद्दल लिहिणे नव्हे; तर त्याचे वेगळेपण काय आहे? प्रतिकूल परिस्थितीवर त्याने कशी मात केली, समाजाला त्याचा काय उपयोग झाला आणि होत आहे? आजच्या युवकांना त्यांच्याकडून काही प्रेरणा मिळू शकते का? आदी बाबींचा बारकाईने विचार करूनच त्या त्या व्यक्तींना या पुस्तकात स्थान देण्यात आले आहे.

लेखकाने मी का लिहितो, माझ्या लिखाणाचे स्वरूप काय? माझ्या लिखाणाचा वाचकांना, समाजाला काही उपयोग होतो का? याबद्दलची भूमिका पुस्तकाच्या मनोगतात मांडली आहे. ते म्हणतात, ज्या परिस्थितीत माझे बालपण, तरुणपण गेले त्या परिस्थितीचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. बिकट अशा आर्थिक, कौटुंबिक, भावनिक परिस्थितीचा मनावर होत गेलेला परिणाम, त्यामुळे येत गेलेले नैराश्य, वैफल्य, ज्यांच्याकडून अपेक्षा होत्या त्यांच्याकडून झालेला अपेक्षाभंग आदींमुळे स्वतःची स्वतःला वाट शोधत राहावी लागली. यातूनच माणसाच्या परिस्थितीपेक्षा त्याची मनःस्थिती महत्त्वाची असते हे उमगले. म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेल्या आणि इतरांनाही यशस्वी होण्यासाठी मदतीचा हात देणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी जीवनकथा लिहिण्याचा मी प्रयत्न करीत असतो.

‘संवाद भूषण’ या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखक जेव्हापासून म्हणजे १९८३ सालापासून पत्रकारितेत आले तेव्हापासून ज्या ज्या व्यक्तींशी त्यांचा परिचय होत गेला, त्या त्या क्रमवारीने या व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्यानुसार नगर येथील छायाचित्रकार अनिल शाह, पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूटच्या वृत्तपत्र विद्या विभागातील वर्गमित्र विचारवंत– लेखक प्रा. डॉ. बाबासाहेब काझी, दूरदर्शनचे निवृत्त संचालक अशोक डुंबरे, निर्माते राम खाकाळ, निवेदिका शिबानी जोशी, कॅमेरामन नरसिंग पोतकंठी, जनमित्र विलास सरोदे, भारतीय माहिती सेवेतील निवृत्त वरिष्ठ अधिकारी सर्वश्री नितीन केळकर, मधुसूदन आडे, ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम, मुख्यमंत्र्यांच्या निवृत्त जनसंपर्क अधिकारी वीणा गावडे, नवी मुंबईतील साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, पत्रकार सर्वश्री राजेंद्र घरत, खंडुराज गायकवाड, नारायण जाधव, नवी मुंबई महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी तथा निवेदक, कवी, लेखक महेंद्र कोंडे, माध्यमकर्मी सर्वश्री डॉ. बबन जोगदंड, सी.के. सुब्रह्मण्यम, प्रवचनकार संध्याताई अमृते, मिशन आयएएस अकादमीचे संचालक, लेखक, प्रभावी वक्ते, प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे, दूरचित्रवाणी पत्रकार मनोज भोयर, संपादक वैशाली आहेर, लेखिका, प्रकाशिका लता गुठे, लेखक प्रा. डॉ. सतीश शिरसाठ, आनंदयात्री मदन लाठी, संपादक मारुती विश्वासराव, पत्रकार किरण बोळे, कवी अशोक बागवे, हास्यकवी अशोक नायगावकर, प्रभावी वक्ते प्रा. साईप्रसाद कुंभकर्ण, गायक– संगीतकार मधुकर घोडविंदे, अष्टपैलू कांचन कंदले आणि बालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे वाचनालये उभारणारी मरियम मिर्झा आदींच्या प्रेरणादायी यशकथा या पुस्तकात आहेत.




या पुस्तकाची निर्मिती ’ग्रंथाली’ने तर प्रकाशन न्यूज स्टोरी टुडेने केले आहे. प्रसार माध्यमांमध्ये काम करण्याची इच्छा बाळगणाऱ्या तरुण–तरुणींनी तर हे पुस्तक अवश्य वाचलेच पाहिजे, पण माध्यमांच्या अंतरंगाविषयी उत्सुकता असणाऱ्या वाचकांनीदेखील हे पुस्तक वाचलेच पाहिजे असे आहे.

– ज्येष्ठ पत्रकार

विवेक प्रकाशन

धर्म महावीरांचा



प्रकाशन : सप्टेंबर २०२४
मराठी - मूळ किंमत : २३०/- रु. । सवलत मूल्य : २०७/- रु.
हिंदी - मूळ किंमत : २६०/- रु. । सवलत मूल्य : २४७/- रु.

भगवान महावीर यांच्या निर्वाणाला या वर्षी २५५० वर्षे पूर्ण होत आहेत. भगवान महावीरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान हे हिंदू तत्त्वज्ञानच आहे, जे जगाला दिशा देणारे, जगाला संघर्षातून बाहेर पडून शांततामय जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करणारे आहे.

भगवान महावीर कोण होते?
जैन परंपरेतील ते कितवे तीर्थंकर होते?
जैन परंपरेत एकूण किती तीर्थंकर होऊन गेले?
भगवान महावीरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान कोणते?
त्यांनी सांगितलेली सूक्ते कोणती?
सर्वोच्च ज्ञानाची प्राप्ती त्यांना कशी झाली?
अशा सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वाचलेच पाहिजे असे पुस्तक.
पद्मश्री रमेश पतंगे लिखित
‘धर्म महावीरांचा’

Accounts Details - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318

संपर्क
९५९४९६१८५८

भगवान महावीर असो, गौतम बुद्ध असो अथवा विवेकानंद असो, या सर्वांचा विचार एकच होता आणि तो म्हणजे ‘विश्वकल्याणाचा’. त्यांनी सांगितलेले हे सर्व तत्त्वज्ञान हिंदू तत्त्वज्ञान आहे. म्हणून आपण भगवान महावीरदेखील वाचले पाहिजे.

समग्रतेने महावीरांच्या जीवनाचा आढावा घेणारे मराठीतील हे पहिलेच पुस्तक असेल.
**मराठी आणि हिंदी दोन्ही भाषेत हे पुस्तक प्रकाशित होणार आहे.**




# मी एक महातारा!

**एका वेगळ्या स्फूर्तीदायक अवस्थेत निघताना वाटले, खरेच साठ वर्षाचे जीवन म्हणजे समृद्ध अनुभवाची शिदोरी गाठीशी असलेली एक नौका! सुख-दु:ख, संकटं, हालअपेष्टा, अपेक्षा, समाधान, आनंद, यशापयश असे अनेक अनुभव असलेल्या महाताऱ्यांनी आपल्या समृध्द अनुभवाचे दालन हळुवार, सहजतेने खुले केले तर त्या लखलखीत प्रकाशात त्यांच्या घरातील ग्रहमंडळ तर प्रकाशित होईलच, परंतु आजूबाजूचे 'ग्रह-उपग्रह' यांच्याही जीवनात लख्ख प्रकाश पडेल. तेव्हा महाताऱ्यांनो, चला, उठा. पसरवा अनुभवाचा लख्ख प्रकाश! करा सारी सृष्टी प्रकाशमान! ...अशा तेजोमय विचाराने प्रेरित होऊन मी घरी पोहोचलो.**

**नागेश शेवाळकर**
९४२३१३९०७१

वयाची पन्नाशी उलटली की मोठा प्रश्न पडतो, तो म्हणजे निवृत्तीनंतर काय करावे? वेळ कसा घालवावा? अनेक जण या विचाराने एवढे बेचैन, अस्वस्थ असतात की, निवृत्तीच्या दिवशी त्यांच्या डोळ्यात पाणी येते. नोकरी असताना वेळच नसतो आणि निवृत्तीनंतर वेळच वेळ असतो.

काही व्यक्ती अशाही असतात, त्या निवृत्तीला विरक्ती समजतात! आपण सेवेतून निवृत्त होत आहोत म्हणजे आपण संसाराच्या मायाजालातून निवृत्त होत आहोत, असा विचार असतो. परंतु तसे नाही, संसार हे असे चक्रव्यूह आहे, त्यातून बाहेर पडणे भल्याभल्यांना जमत नाही. आजकाल बहुतेक कुटुंबातील मुलगा आणि सून दोघेही कामानिमित्त दिवसभर बाहेर असतात. त्यांच्या पश्चात नातवंडांची जबाबदारी साहजिकच कुटुंबातील ज्येष्ठांवर येऊन पडते. नातवांच्या बाललीला, त्यांची छोटी मोठी कामे करणे हा फार मोठा विरंगुळा असतो. नातवंडासोबत रमले की, सारी दुःखं दूर पळून जातात.

निवृत्तीनंतर घरातील छोटीमोठी कामे करताना स्वतःच्या आवडीच्या छंदाकडे लक्ष दिले पाहिजे. अशा छंदामुळे आयुष्य सुसह्य होते, सकारात्मक होते. नोकरीमुळे आवडीच्या छंदाकडे दुर्लक्ष झालेले असते. भजनाची, लेखनाची, गायनाची, वाद्य वाजवण्याची, वाचनाची आवड अनेकांना असते. त्यामुळे निवृत्ती म्हणजे आपल्या आवडत्या छंदांना पुनरुज्जीवित करण्याची संधी सहर्ष स्वीकारली पाहिजे.

दुसरीकडे अनेक जण निवृत्ती ही आसक्ती समजून वाटचाल करतात. 'मला हे हवं, ते हवं. मला हे मिळालेच पाहिजे...'



अशा हटवादी भूमिकेत वावरतात. निवृत्त होईपर्यंत असलेल्या 'हम करे सो कायदा...' ही सवय या वळणावर घातक ठरते. मुले मोठी झालेली असतात, कमावती असतात. त्यांचे अनुभवविश्व वेगळे असते. त्यामुळे लहानसहान गोष्टींमध्ये वारंवार सल्ला द्यायलाच पाहिजे असे नसते. मुलांच्या चुका सातत्याने दाखवून दिल्याने मुले कंटाळतात. ते ज्येष्ठांपासून दुरावतात, संवाद कमी होतो. त्यामुळे ज्येष्ठांमध्ये आपण एकटे पडल्याची भावना बळावते. एकटेपणाची जाणीव होताच चिडचिड, संताप, अशा भावना बळावतात.

वयाची साठी गाठलेली व्यक्ती म्हणजे जणू छोट्या मोठ्या आजाराचे माहेरघर! गुरुवर्य प्राचार्य राम शेवाळकर यांनी असे म्हटले आहे की, साठीनंतर येणारा आजार कधी एकटा येत नाही. तर सोबत अनेक आजारांना घेऊन येतो. एकदा का आजाराचा समूह मानवाच्या शरीरात शिरला की, हे आजार मानवाच्या अंतापर्यंत त्याच्या सोबतीला असतात. त्यामुळे प्रत्येकाने पन्नाशीनंतर असे कोणतेही आजार होऊ नयेत ही काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी निवृत्ती म्हणजे संसाराबाबतीत जशी विरक्ती नसावी, तशीच संसाराबद्दल अतिरिक्त आसक्तीही नसावी.

प. पू. ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज यांनी एक छान मंत्र दिला आहे. ते म्हणतात, 'स्वतःच्या मुलाकडे राहतानाही पाहुण्याप्रमाणे राहिले पाहिजे.' वरवर पाहिले तर हे वाक्य अत्यंत साधे वाटत असले तरी आनंदी, समाधानी जीवन जगण्याचा तो एक साधा मार्ग आहे. सुखी जीवनाचे सार आहे...

त्या दिवशी नेहमीप्रमाणे आम्ही पाच-सहा ज्येष्ठ नागरिक एकत्र बसलो होतो. एकानंतर एक असे अनेक विषय चर्चेला येत होते. प्रत्येक जण, चर्चेत भाग घेऊन स्वतःचे मत मांडत होता. चर्चा सुरू असताना एक जण स्वतःचा उल्लेख 'म्हातारा' असा करत होता. ते ऐकून एक व्यक्ती म्हणाली, ''स्वतःला म्हातारा समजू नका तर महातारा असे म्हणा. म्हातारा हा साडेतीन अक्षरांनी सुरू होणारा शब्द किती अर्थपूर्ण आहे ते लक्षात घ्या. म्हातारा या शब्दातील अर्धा 'म' आहे ना, त्याला आपण पूर्णत्व देऊ! म्हातारा या शब्दाचा झाला 'महातारा'! महातारा किती छान संकल्पना आहे ना! आता या नवीन शब्दाचा थोडा वेगळा विचार करू या.''

ग्रहमंडळातील महातारा म्हणजे प्रत्यक्ष सूर्यदेव! धरणीमातेला अंधारातून बाहेर काढून लख्ख प्रकाशमान करणारा महातारा म्हणजे भास्कर... रवी! आपणही म्हातारे होऊन अडगळीत पडण्यापेक्षा महाताऱ्याप्रमाणे आपल्या गृहमंडळाला प्रकाशित करीत राहूया. मुलांच्या संसाराला, जमेल तसा प्रकाश देत राहू... अनुभवाची ऊर्जा देत राहू. म्हणजे मदत करीत राहू.

त्या व्यक्तीने समोर ठेवलेली ही नवीन परिभाषा आणि ज्येष्ठांची थेट सूर्यासोबत केलेली तुलना ऐकून आम्ही सारे भारावून गेलो. त्याच वेळी आम्हाला आमच्याकडे असलेल्या एका अनोख्या तेजस्वी शक्तीची जाणीव झाली.

एका वेगळ्या स्फूर्तीदायक अवस्थेत निघताना वाटले, खरेच साठ वर्षांचे जीवन म्हणजे समृद्ध अनुभवाची शिदोरी गाठीशी असलेली एक नौका! सुख-दुःख, संकटं, हालअपेष्टा, अपेक्षा, समाधान, आनंद, यशापयश असे अनेक अनुभव असलेल्या महाताऱ्यांनी आपल्या समृध्द अनुभवाचे दालन हळुवार, सहजतेने खुले केले तर त्या लखलखीत प्रकाशात त्यांच्या घरातील ग्रहमंडळ तर प्रकाशित होईलच, परंतु आजूबाजूचे 'ग्रह-उपग्रह' यांच्याही जीवनात लख्ख प्रकाश पडेल. तेव्हा महाताऱ्यांनो, चला, उठा. पसरवा अनुभवाचा लख्ख प्रकाश! करा सारी सृष्टी प्रकाशमान! ...अशा तेजोमय विचाराने प्रेरित होऊन मी घरी पोहोचलो. सौभाग्यवती वाहिनीवर एक नाटक बघत होती. मी महातारा या विचाराने एवढा प्रभावित झालो होतो की, मला त्या नाटकाचे नावही 'म्हातारा नव्हे महातारा!' असेच असल्याचे दिसत होते.




# दडगं

**आण्णाची म्हातारी, बायकु दवाखान्याच्या व्हरांड्यात अंग मुरगाळून एका कोपऱ्यात पडल्या हुत्या. रामू बाहेर वारवशी टावेल हातरून आडवा झालेला. आण्णा खाटीवर पडून काही-बाही आटवत हुता. रामूला वाटत हुतं, आण्णाच्या दडग्यापणामुळे ही वेळ आली. फाटदिशी बोलला असता, मला लांबडं शिवलंच न्हाय तर ही वेळच आली नसती. तर आण्णाला वाटत हुतं, रामूनं काहीबाही सांगून माझा आजचा बाजार उठवला होता. कसलं काय, अन् कसलं काय! कुठलं लांबडं शिवलंच नव्हतं. नुसतं मनाचं भ्या उभं राहिलं हुतं.**

**रावसाहेब पुजारी**

९३२२९३९०४०.

आण्णा आर्दल्या आणि रामू समगोंडा दोघं शेतातनं आडवाटीच्या रस्त्याला लागलं. आण्णाच्या पट्टीला लागूनच रामूचं श्यात हुतं. रामू आला तसं आण्णा त्याच्याबरोबर वाट चालू लागला. दिस कवाच बुडला हुता. कडुसं पडलेलं होतं. पायाखालची वाट ते आदमासानं चालत हुतं. आण्णा फुडं अन् रामू मागं. पावलांवर पाऊल पडत होतं. अचानक पायात काय तरं खसपसलं, तसं आण्णा दचाकला अन् जरा माग सरला, तसा मागचा रामू चालता चालताच त्याला येऊन धडाकला.

तसा अण्णा वरडालाच, 'आरं आरं, रामू, पायात काय तर हुतं, ते बाजूच्या रानात गेलं. लांबडं हुतं वाडतं.' तसा रामू काळजीच्या स्वरात म्हणाला, 'चावलंबिवलं न्हायं न्हवं? न्हायतर झटाकधीशी खांद्यावर घालून डागदराकडं गेलं पाहिजे पळत. ईष वर चढायचं. गडी हातचा जाईल.'

'चावलंबिवलं न्हाई, पर लांबडं हुतं वाडतं,' आण्णानं पुन्हा खुलासा केला.

'आपण दोगं असताना चावायला काय गांडीला दात आल्यात व्हंय त्याच्या,' आण्णानं उसनं आवसान आणून रामूला फुशारकीचा टोला लगावला. तसं रामू म्हणाला, 'तर तर, दांडगा सूरमाऱ्या गडी तू. तुला भिऊनच पळालं वाडतं ते.'

शेताकडच्या कामात दोघाकडंबी बॅटरी का फिटरी. डोळ्यांत बोट घातलं तरी फुडचं कायबी दिसत नव्हतं. बांधावरची पायवाट ती. दोन्ही अंगानं गवत वाढलेलं. त्यातनं सळसळ करत लांबडं आडवं गेलं. दोघांनाबी ते दिसलं नव्हतं.

पण काहीतरी सरपट गेलं होतं मात्र. मनाला बोच नको म्हणून अण्णानं पायातली दोनी पायताणं झाडली , अंगट्यात बोटं घालून बगीतली. गुंडग्यापरत धोतार झाडलं, त्यात काहीच मागमूस लागत नव्हता. त्याच्या मनानं उगच सावट धरलं होतं.

रामूनं अण्णाला धीर दिला. अन् म्हणला, 'चलं रं अण्णा कुटं आलंय हितं लांबडं अन् फिमडं. तुझ्या मनाला भास झाला असेल. आमी सगळी रोज याच रस्त्यानं येतु नव्हं. तुझी बायकु अन् दोगी भांगलायला आलेल्या बायका याच रस्त्यानं गेल्या नव्हं फुडं. त्यास्नी कुटं दिसलं नाय अन् तुलाच तेवढं लांबडं पायात येतय व्हंय. तुला भास झाला असेल.'

'सक्काळी आंगुळ केलतीस नव्हं? कामाला जुप्पी करायच्या अगुदर रानातल्या लक्ष्मीला पाया पडला हुतास न्हंव?' रामूनं आण्णाला उगीचच बरेच प्रश्न विचारलं. तसा आण्णा कातावला.

'प्रसंग काय? विचारतोय काय?'

'झवन्या, ह्या लांबड्याचा अन् रानातल्या लक्ष्मीचा काय संबंध? ती आपली हाय आपल्या जाग्यावर बसल्या, बसू दे की तिला.'

'तसं न्हंवं रं आण्णा, तुला आटवतंय का बघ, गुदस्ताच्या न्हंव, ते त्याच्या गुदस्ताला मधल्या पट्टीत मळ्यातल्या ढंम्प्याला लांबडं शिवलं होतं. गवत कापताना त्याचा पायच लांबड्याच्या अंगावर पडला. झवन्यानं ढंम्प्याचा अंगठाच फोडला. ढंम्प्या बोंबलायला लागला. रगाद गळायला लागलं. लांबडं उलटंपालटं झालं. ढंम्प्याच्या पायावर त्याच्या दाताच्या खुणा दिसत व्हत्या. रानातलं चार गडी गोळा झालं. पिंडरीजवळ करकचून बांधलं. पायाच्या रक्तवाहन्या जाग्यावर थांबवण्याचा प्रथमोचार केला. झाडपाला तोंडात चावायला दिला. त्याला उचलून खांद्यावर घेतलं. धावत-पळत सगळी गावात आली. तिथून त्याला डागदराकडं नेलं. तरी त्याचं ईष वर चढलं हुंत म्हणं. अंग काळं-निळं व्हायला लागलेलं. कल्ल्या झांझुरट्यानं गाडी बेफाम पळवली. उभ्या घाईनं डागदराला बोलवून खाली आणला.' रामू समगोंडानं एक जुनी आठवण आण्णा आर्दल्यासमोर उभी केली, तसं आण्णाच्या मनात आणखी भ्या पडलं. खरंच आपलीसुदिक तशी अवस्था होईल, असं त्याला वाटू लागलं.

'ही काय बला झाली म्हणायची?'

गाव अजून फर्लांगभर लांब होतं. दोगांनी मागं बघितलं नाय, ते झटाझटा पावलं उचलत हुती. लगालगा गाव जवळ करत हुंती. रानातली आडवाट सपली अन् पाणंद - गाडीवाट लागली, तसं दोघांच्या जिवात जीव आल्यासारखा झालं. फुडं गावातल्या लायटी दिसू लागल्या, तसं गाव जवळ आल्याचा त्यांना भास होऊ लागला. आगतीनं दोगंबी पावलं झटाझटा उचलत हुती. झपाट्यानं चालल्यानं दोघांचं जीव घाबरंघुबरं झालेलं हुतं. काई हुतंय कुणास ठाऊक म्हणून दोगांनाबी भारी घोर पडला हुता. आण्णा फुडं अन् रामू मागं.

आण्णा आणि रामू रोजच त्या वाटेनं येत-जात होतं. ती त्यांच्या शेताकडं जायचीच नेहमीचीच वाट हुती. असं कवाच तिकडं झालं नव्हतं. पण काय सांगायचं, आलं असेल आडवं लांबडं आणि तसंच सरपटत गेलं असेल पुढं. त्याला काय आण्णा आणि रामू यायला लागल्याती म्हणून माहिती होतं थोडंच. का कुणी त्याला सांगावा दिला हुता? आण्णा मनातली संका दूर करायचा प्रयत्न करत होता. अन् रामू समीदा टाकल्यासारख्या एकेक जुन्या आठवणी सांगत होता. त्याला आपलं मनात हे बी नाय, अन् ते बी नाय. तो सहजपणे बोलत होता.

घटनाच लांबड्याच्या संबंधीची हुती, त्यामुळे त्याला त्या संबंधीचं सगळं आठवत हुतं. रामूनं तोंडाचा पट्टा चालूच ठेवलेला. रस्ता चालता चालताच तो बोलत होता. आण्णा फुंडं अन् रामू मागं. रस्ता तुडवत निघालं होतं गावाकडं.

'तसंबी असत्यंय लेकाच्या आण्णा, ढंम्प्याच्या येळंला बगीतलं होतं. भला धिप्पाड गडी, पण लांबडं शिवलं तसा गडी आट-पंदरा दिवस दवाखान्यात पडून हुता. रोज डागदर येऊन कवा बेंबीत टोच, कवा कमरंत टोच करत हुतं. दोनी डंडाची तर चाळण हुन बसलेली. डागदराला सुई टोचायला नवी जागाच राहिली नव्हती. बरंच बरं म्हणून त्याचा जीव वाचला, नाहीतर काय खरं नव्हतं. त्याचं म्हातारंबी असंच साप चावून मेलं हुंत.'


**सरसरता साहित्य पत्रिकेसाठी लिहिते व्हा...**

आपल्या कथा, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इ. साहित्य समरसता साहित्य पत्रिकेत प्रकाशित करू शकता. आपले साहित्य संपादक समरसता साहित्य पत्रिका १/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई - ७८ या पत्त्यावर पाठवावे.

'कुणीतरी सांगीतलं म्हणून ढंम्प्याची म्हातारी देवरश्याकडं गेली, तवा त्यानं तिला ढंम्प्याला ताईबाई लागल्याचं सांगितलं. पाच-सहा वर्षे त्यांच्या घराण्यात कुणीच मळ्यातल्या ताईबाईला कोंबडं कापलं नव्हतं. तीच ढंम्प्याला ईवून चावली म्हणं. गुदस्ता त्यांनी ताईबाई केली. कोंबडं, निवद, नारळ, लिंबू, पाच दाण्याचा धामटा ताईबाईच्या पुढ्यात पुरलं. पाच तिकटीला सात दाण्यांचा धामटा, पिवळा भात अन् चटणी उतरून टाकली. तवापास्न तिकडं लांबडं फिरायचं बंद झालंय.'

रामूच्या या असल्या बोलण्यानं आण्णाच्या पोटात अधिकच भ्याय पडलेलं. स्वासागणिक त्याला घाम येऊ लागला. गडी भेंडाळून गेलेला.

'आपलं कुठं चुकलं न्हायं न्हवं? म्हातारीला विचारायला पायजेल.' रामूनं मनातल्या मनात प्रश्न विचारला. तीन वर्षांच्या अगुदर मळ्यातली लक्ष्मी केली हुती. तुक्याचं थोरलं पालवं कापलं हुतं त्यावेळी. थोरला श्यामुदादा दारू पिवुन टाइट झाला हुता. ताईबाईचं त्याला काई आटवत नव्हतं.

पाणंद सपली तसं दोगंबी गावतल्या रस्त्याला लागलं. तवा गावात रस्त्यावरचं पंचाईतीच्या लायटी लागल्या हुत्या. रस्त्यावर सगळा उजेड दिसत हुता. माणसांची पावलं सुदिक कुठं पडत्यात, ते सपय दिसत हुंत. कुणी बगायच्या अगुदर रामू आणि आण्णा झटक्याधीशी आण्णाच्या घरात शिरलं. आण्णाची बायकु, शिरमा रानातनं येऊन सयपाकाला लागली हुती. काटवटीत भाकरीला पीट मळत हुती. म्हातारी पडवीत बसवून काय तर भाजीपाला नीट करत हुती. भाजीची देठं बाजूला टाकून भाजीचा पाला सुपात टाकत हुती. पोरं अंगणात नुसताच हुदुड्या घालत हुती.

रामूनं दारातनंच आवाज दिला, 'कुठायसा? आण्णाला लांबडं शिवलंय नव्हं.'

धन्याला लांबडं शिवलंय ह्ये ऐकून शिरमाच्या काळजात धस्स झालं. हातातलं सगळं टाकून ती झटाकधीशी बाहेर आली. आण्णा चालून चालून दमला हुता. त्यात रामून लांबड्याच्या गोष्टी सांगून त्याला आणखी गळीत करून सोडलं होतं. त्याला शब्द फुटत नव्हता. तो घाबराघुबरा झालेला हुता.

'व्हंयवं, भाऊजी... कुठंसं लांबडं शिवलं ह्यास्नी?'

'आपल्या अन् तुमच्या रानाच्या तीन पट्ट्या फुडं आलुतो, तवर सगळं घडलं.'

'तुमी बघीतलासा नव्हं?'

'म्या काय लांबडं बघीतलं न्हाय गड्या, पण आण्णाला ते दिसलं का भास झाला कुणास ठाऊक? तर त्यो तर म्हणतोय पायात लांबडं हुतं.'

'मग त्याला मारलासा का?'

'वैनी, ते घावतंय व्हंय वं? झवन अंधारात कुटं बेपत्ता झालं. आण्णालाबी दिसलं नाय, मलाबी दिसलं नाय. आण्णा म्हणतुया म्हणून त्याला लांबडं म्हणायचं झालं.'

शिरमा एकामागून एक शंका विचारत हुती अन् रामू तिच्याकडं पाहत कायतर थातुरमातूर सांगून वेळ मारून न्येत हुता. आण्णाला शब्दच फुटत नव्हता. त्याची ही अवस्था बघून सगळे गर्भगळीत झाली हुती. तवर आण्णाची म्हातारी पडवीतनं खाली आली. तिनं सगळ्यांना बाजूला सारलं अन् तिनं आण्णाला धीर दिला. म्हणाली,

'कुटं चावलं रं बाळा? फुरूड हुता का नाग? का किडकं हुतं?'

'किडक्यानं शिवलं तरी काई हुत न्हाई. त्याला ईष का फिष?'

'तुमी दोगांनी बघीतलसा नव्हं नीट?'

'तुमी दोगं संगटीच हुतासा नव्हं रं पोरानु?'

त्यावर स्पष्टीकरण देत रामू म्हणाला, 'आगं, काकू, आण्णा अन् मी शेताच्या आडवाटनं ईत हुत्यू. सगळं अंधारलं हुतं. आण्णा फुंड अन् मी मागं त्याच्या लगुलगुच हुत्यू. रोजची पायाखालची वाट. आण्णा एकदम दचाकला. त्याला पायातनं लांबडं गेल्याचा भास झाला. त्याला दिसलं का न्हाय ते काई मला कळलं नायं. त्यो वरडला तवा मला हे समदं कळलं. आमी बघीतलं. कुटं चावलेलं दिसलं नाय. पर डागदरला दाखवुन बघू या. मनात काई दडगं ठेवायला नगु.'

पाच मिनिटं बसल्यावर आण्णाला जरा धीर आला. तो म्हणाला, 'आगं, आये, चावलं-बिवलं काय नाय.' चालताना पायाजवळ काय तर सळसळलं. ते पायातनं फुडं गेलं. त्यामुळं मी दचाकलो. ह्या रामूनं लांबडं शिवलं, लांबडं शिवलं म्हणून डोकंच उटवलंय. रानातनं घरापरयंत येईस्तोवर माझं भंड पडलं. त्यांनं मळ्यातल्या ढंम्प्याला साप चावल्याचं सांगून भ्या घालायला लागलाय. त्यांनं ताईबाई काढली, मळ्यातली लक्ष्मीला निवद नारळ दिलासा का म्हणून खोदून खोदून विचारलं. तवा माझ्या मनात लांबड्याची भीतीच उभी राहिली. मी घाबरलो. जणू मला लांबडं चावलंयच असा भास होऊ लागला.'

'बाळा, तसं नव्हं, दडगंगाणं काई ठिऊ नगुस. कुठं लांबड्याचा दात लागला असेल, कुठं ईष लागलं असेल तर सांग. दडगं राहील अन् रात्री कुटं बैयदा झाली तर, कुटं

डागदर शोधायचा? त्यापरास आपुन डागदराकडं जाऊ. रामू काय लोकाचा हाय. त्यो बरं एकाचं दोन सांगंल.’ असं म्हणत म्हातारीनं आण्णाचा पाय चाचपून बघीतला. तिला तर काय लांबड्याच्या पायावर खाणा-खुणा दिसत नव्हत्या.

त्यावर आण्णा काईच बोलला न्हाई. तो गप्पच बसून राह्यला. आण्णाच्या म्हातारीनं, आण्णाच्या छातीला हात लावून बघीतलं. डोळ्याच्या पापण्या खाली-वर केल्या. जीब भाइर काढायला लावली. म्हातारीच्या अनुभविक नदरला तर काईच लागत नव्हतं. आण्णाची बायको, पोरं आण्णाच्या भवताली घाबरीघुबरी होऊन बसलेली. वार्ता समजली तसं गल्लीतली माणसं गोळा झालेली.

गावातली माणसं रात्रीच्या जेवणाला बसलेली. कुणीला जेवून पान-तंबाखू खात हुतं. कुणी शहाणा गडी जेवल्यावर चार पावलं चालत-फिरत दूरवर येऊन पान चघळत हुता, कुणी बेडशिपीची पुडी तोंडात टाकत मुखमार्जन करत होतं. कुणी सिगारेटी-बिड्या सिलगावत नाका-तोंडातून तिचा धूर हवेत सोडत होतं. बाया-माणसं जेवणं आटपून भांडीकुंडी जास्तानी लावत हुती. इकडं आण्णाच्या घरानं मात्र लांबडं शिवल्याच्या शंकेनं सगळ्यांच्या मनात दडगंगाणं उभं केलं हुतं. ह्या सगळ्या घोळाला रामूच जबाबदार असल्याचं आण्णाचं पक्कं मत झालं हुतं.

आण्णाच्या म्हातारीचा जीव खाली-वर होऊ लागला होता. रात्रीची वेळ ऐनवेळी काय झालं, तर कुणाच्या तोंडाकडं बघायचं. डागदराकडं जाऊ या. दोन इंजेक्शन टोचलं म्हणजी संका दूर होईल. त्याच्याएवढं आमाला समजतंय व्हंय?

तसं आण्णा, आण्णाची म्हातारी, बायकु, रामू तालुक्याच्या गावाला दवाखान्याला दाखवायला गेली. तिथं डाक्टर नुकतेच घरी गेले होते. तिथं असलेल्या नरसीनबाईनं साप चावल्याची केस म्हणून आण्णाला अडमीट करून घेतलं. केसपेपर रंगविले. रजिस्टरला केस दाखल केली. कुटं चावलं, कुटं खरचटलं, कुटं सापाचं दात लागलेत, याची तिनंबी खातरजमा केली. तशा कुटल्याच खुणा तिला दिसत नव्हत्या. पण केस रजिस्टरला ओढल्या म्हटल्यावर डाक्टरनी बघीतल्याशिवाय पेशंटला जाऊ देता येत नाही. त्यांचा शेरा महत्त्वाचा असतो. एका रिकाम्या खाटीवर आण्णाला झोपवला. बाकी संमदी डाक्टरच्या प्रतीक्षेत बसून राहिली. तास-दोन असंच डागदराच्या वाट पाहण्यात गेलं. रात्र हळूहळू पुढं सरकत होती.

आण्णा खाटीवर पडून होता. रामूला त्याची कीव येत हुती. रात्रपाळीची एक डाक्टर मुलगी आली आणि तिनं एकेक पेशंट तपासले. ती आण्णाजवळ आली. तिला त्याच्या शरीरावर सर्पदंश झाल्याच्या कोणत्याच खाणा-खुणा दिसत नव्हत्या. तिनं मोठ्या डाक्टरना फोन लावला. परिस्थिती सांगीतली, तसं त्यांनी सांगितलं, ‘आता मी काही तिकडं येत नाही. पेशंटला अडमीट करून घ्या. प्राथमिक दक्षता म्हणून काही औषधे द्या. मी सकाळी त्यांना नीट तपासतो. मग पाहू त्यांना डिस्चार्ज द्यायचं ते.’


आण्णाची म्हातारी, बायकु दवाखान्याच्या व्हरांड्यात अंग मुरगाळून एका कोपऱ्यात पडल्या हुत्या. रामू बाहेर वारवशी टावेल हातरून आडवा झालेला. आण्णा खाटीवर पडून काही-बाही आटवत हुता. रामूला वाटत हुतं, आण्णाच्या दडग्यापणामुळे ही वेळ आली. फाटदिशी बोलला असता, मला लांबडं शिवलंच न्हाय तर ही वेळच आली नसती. तर आण्णाला वाटत हुतं, रामूनं काहीबाही सांगून माझा आजचा बाजार उठवला होता. कसलं काय, अन् कसलं काय! कुठलं लांबडं शिवलंच नव्हतं. नुसतं मनाचं भ्या उभं राहिलं हुतं.

विचार करता करता मध्यान्ह रात्र उलटून गेली होती. आण्णाला हास्पिटलच्या खाटीवरच डोळा लागला होता. अन् तो ढाराढुर घोरत होता. रामूला उघड्यावर डोळा लागला होता अन् त्याच्या अंगावर चिलटांनी फेर धरला होता.


# प्राणायाम
## एक अमृतानुभव

लेखक - योगतज्ज्ञ मनोज पटवर्धन

आनंदी, निरामय जीवनासाठी सध्या **प्राणायामाला** पर्याय नाही.
त्यामुळे **आजच आपली प्रत नोंदवा आणि आपले आयुष्य सुंदर करा!**




प्राणायाम कोणता करावा, कसा करावा, किती करावा, कधी करावा? या सर्व प्रश्नांची उत्तरे या एका पुस्तकातून आपल्याला मिळतील.

**किंमत : २५०/- रु.**
**१० टक्के सवलतीत उपलब्ध**

शिकु या प्राणायाम सहज सोप्या पद्धतीने

**Accounts details. - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA**
BANK OF MAHARASHTRA
**Branch :** PRABHADEVI
**A/C no. :** 20109800154
**IFSC no :** MAHB0000318

**संपर्क :** ९५९४९६१८५८




# बंदिशाळा

**अनेक वक्त्यांच्या भाषणांनी सभा दणाणून निघाली होती. प्रत्येक वक्ता आपल्या परीने अन्यायावर भाष्य करत होता, मोठमोठी वक्तव्ये करत होता. अस्पृश्य समाजाच्या वेदनांचे कथन करत होता नि त्यास न्याय देण्याची भाषाही करत होता. पण श्रोत्यांच्या नजरा मात्र एकाच दिशेला लागल्या होत्या. महाडच्या त्या रणरणत्या उन्हातही हजारो डोळे आसुसले होते त्या महामानवाच्या दर्शनासाठी, ज्याने त्यांच्या अंधकारमय जीवनात प्रकाशाची एक नवी किरणे आणली होती. अचानक वातावरणात एक गूढ शांतता पसरली. आणि मग, व्यासपीठाच्या एका बाजूने एक आकृती समोर आली. पांढरेशुभ्र कपडे, अंगात कोट, डोळ्यांवर चष्मा आणि चेहऱ्यावर एक अभेद्य शांतता... डॉ. बाबासाहेब आंबेडकर!**

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

९९६७७९६२५४

सखूने हळूच पितळेचा हंडा तळ्याच्या पाण्यात बुडवला. थंडगार पाण्याचा स्पर्श तिच्या हातांना होताच, तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले. तिच्या शेजारी उभ्या असलेल्या जानकीनेही थरथरत्या हातांनी आपला हंडा पाण्यात सोडला. आजवर केवळ स्वप्नात पाहिलेला हा क्षण प्रत्यक्षात येत होता. त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उत्सुकता आणि धाकधूक स्पष्ट दिसत होती. काही लहान मुलं, राजू आणि त्याची बहीण, त्यांच्या आईच्या मागे लपून हे सर्व पाहत होती. राजूने धाडस करून ओंजळीने पाणी घेतले आणि घटाघटा प्यायला सुरुवात केली. ‘आये, हे पानी खरंच गोड हाय!’ तो निरागसपणे ओरडला. त्याच्या आवाजात एक प्रकारचा विजयोत्सव होता. तळ्याच्या काठावर एक वेगळंच चैतन्य पसरलं होतं. बायका हंडे भरत होत्या, मुलं पाण्यात खेळत होती. त्यांना वाटलं की आता सर्व काही बदललं आहे, पण...

अचानक दूरवरून एक कलकलाट ऐकू येऊ लागला. सुरुवातीला तो अस्पष्ट होता, पण हळूहळू तो वाढत गेला. बायकांनी एकमेकांकडे पाहिलं. त्यांच्या चेहऱ्यावरची शांतता नाहीशी झाली आणि भीतीची एक गडद छाया पसरली. त्यांच्या मनात एक अनामिक भीती दाटून आली. ‘तो कसला आवाज हाय गं?’ जानकीने घाबरून विचारलं. सखूने दूरवर पाहिलं. रस्त्याच्या वळणावर एकच गर्दी दिसू लागली. हातात लाठ्या-काठ्या आणि तोंडाने शिवीगाळ करत एक जमाव त्यांच्या दिशेने येत होता. त्यांच्या डोळ्यांत क्रूरता आणि द्वेष

स्पष्ट दिसत होता. 'आये गं, म्येलो आत्ता!' सखूच्या तोंडातून शब्द बाहेर पडले. तिने पटकन राजूचा हात पकडला.

तो जमाव वेगाने त्यांच्या दिशेने येत होता. 'धर्माचा अपमान सहन करणार नाही! अस्पृश्यांना पाणी मिळणार नाही! तळे अपवित्र करू देणार नाही!' अशा घोषणांनी वातावरण गढूळ झालं. त्यांच्या चेहऱ्यावरची धर्मांधता त्यांना कोणत्याही थराला जायला प्रवृत्त करत होती. बायका आणि मुलं घाबरून गेली. त्यांनी आपले हंडे टाकून पळायला सुरुवात केली. काही बायकांचे हंडे रस्त्यातच फुटले, पाणी मातीवर सांडलं. जणू त्यांची आशाच पुन्हा एकदा मातीमोल झाली होती. सनातन्यांचा जमाव तळ्याच्या काठावर पोहोचला. त्यांनी हातातल्या लाठ्या-काठ्या हवेत फिरवत बायकांना आणि मुलांना शिवीगाळ करायला सुरुवात केली. 'निघा इथून!' त्याने एका बाईच्या हातातला घडा हिसकावून घेतला आणि तो फोडून टाकला. घड्याचे तुकडे सर्वत्र विखुरले. जणू काही त्यांच्या आत्मसन्मानाचे तुकडे झाले होते. काही बायका रडू लागल्या. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. जमावाने तळ्याचे पाणी अपवित्र झाले आहे, अशी ओरड करत ते पाणी शुद्ध करण्यासाठी गोमूत्र शिंपडले. राजू आपल्या आईच्या मागे लपून हे सर्व पाहत होता. त्याच्या इवल्याशा निरागस डोळ्यांत भीती आणि संताप होता. त्याला वाटले की, हे जग किती क्रूर आहे. सखूने रागाने त्या जमावाकडे पाहिले. पण तिचा राग लुळापांगळा होता. पाहता पाहता आक्रमक झालेल्या जमावाच्या भीतीने ते सर्व जण पळून गेले.

ही बातमी रत्नागिरीत येऊन धडकली.

'काय? अशक्य... अशक्य आहे, आपला हिंदू समाज एकीकडे आम्ही कोणावरही आक्रमण केले नाही, कोणाचा अधिकार हिसकावून घेतला नाही म्हणून मिश्या पिळायच्या आणि दुसरीकडे आपल्याच हिंदू समाजातील बांधवांच्या सामान्य अधिकाराचाही चुराडा करायचा. अस्पृश्यतेची रूढी ही अन्याय्य आणि आत्मघातकी आहे. आपल्याच हिंदू बांधवाला पशूपेक्षाही अस्पृश्य समजणे हा केवळ त्या माणसाचा नव्हे तर तो आत्म्याचाही महा अपमान आहे. संत एकनाथांनी तहानेनं व्याकूळ होऊन तडफडणाऱ्या गाढवाला पाणी पाजून जीवदान दिलं. हे पाणी म्हणजे, त्यांनी काशीहून आणलेलं गंगाजल होतं. मग या गोष्टी काय केवळ मनोरंजनासाठीच आहेत काय? संस्कार म्हणून आपण यांचा स्वीकार करणार आहोत की नाही? बाबा, बाबा अरे मला कधीकधी प्रश्न पडतो की आपण या समाजासाठी लढा देतोय? जो समाज पाण्याचा अधिकार नाकारतो, तोही आपल्या धर्मातल्या बांधवांना?' सावरकरांचा संताप शिगेला पोहोचला होता.

'तात्या, तुझा संताप योग्य आहे. कारण तो सात्त्विक आहे. पण तू आमचा सेनापती आहेस. तूच जर असा हताश झालास तर...' बाबाराव सावरकरांची समजूत काढण्याच्या उद्देशाने म्हणाले. 'हताश नाही झालोय बाबा, अस्वस्थ झालोय. आपल्या हिंदू समाजाला कळत नाही की, आपण स्वतःसाठी खूप मोठा खड्डा खणून ठेवतोय. स्वामी श्रद्धानंद यांच्या चितेचा अग्नी शांत होत नाही तोच हे असं? स्वामीजींनी हिंदू संघटनेसाठी बलिदान दिलं. हे बलिदान व्यर्थ जाता कामा नाये. बाबा, काही वर्षांतच हे इंग्रज क्रांतिकारकांना भिऊन देश सोडून जातील, पण बाबा त्याहीपेक्षा मोठं संकट आपली प्रतीक्षा करीत उभं आहे.' 'कोणतं संकट तात्या?' 'फाळणीचं...' बाबांच्या हृदयात चर्रर्र झालं. ते एकदम चवताळून उठले, 'नाही, तात्या... फाळणी हिंदुस्थानाची? मुळीच नाही. आपण लढू. हवं तर आपल्या गरम रक्ताने अभिषेक करू. पण फाळणी नाही. हिंदू संघटित राहिले पाहिजेत. जेव्हा जेव्हा हिंदू असंघटित झाला, तेव्हा तेव्हा फाळणी झालेली आहे. पण एका गोष्टीने आंबलेलं मन प्रसन्न होतं की या लढ्यात आपण एकाकी नाही. अनेक योद्धे आपापल्या परीने हा लढा देत आहेत.' 'तुझा रोख कोणाकडे आहे, तात्या?' सावरकरांनी थोडं प्रसन्न मुद्रेने बाबारावांकडे पाहिलं, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर...'

अनेक वक्त्यांच्या भाषणांनी सभा दणाणून निघाली होती. प्रत्येक वक्ता आपल्या परीने अन्यायावर भाष्य करत होता, मोठमोठी वक्तव्ये करत होता. अस्पृश्य समाजाच्या वेदनांचे कथन करत होता नि त्यास न्याय देण्याची भाषाही करत होता. पण श्रोत्यांच्या नजरा मात्र एकाच दिशेला लागल्या होत्या. महाडच्या त्या रणरणत्या उन्हातही हजारो डोळे आसुसले होते त्या महामानवाच्या दर्शनासाठी, ज्याने त्यांच्या अंधकारमय जीवनात प्रकाशाची एक नवी किरणे आणली होती. अचानक वातावरणात एक गूढ शांतता पसरली. आणि मग, व्यासपीठाच्या एका बाजूने एक आकृती समोर आली. पांढरेशुभ्र कपडे, अंगात कोट, डोळ्यांवर चष्मा आणि चेहऱ्यावर एक अभेद्य शांतता... डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

त्यांचे पाऊल व्यासपीठावर पडताच जणू व्यासपीठही धन्य झाले. त्यांच्या चालीत एक राजबिंडा डौल होता, पण त्याहून अधिक होता एक जबरदस्त आत्मविश्वास. फाटके, मळके कपडे घातलेली दीन जनता समोर बसली होती. बाबासाहेबांचे आगमन होताच, तो जनसमुदाय एका क्षणात शांत झाला. ज्यांच्या काळजात शतकानुशतके अन्यायाची धगधग होती,





त्यांच्यासाठी आंबेडकरांचे दर्शन म्हणजे नव्या युगाचा प्रारंभच. बाबासाहेब सावकाशपणे व्यासपीठाच्या मध्यभागी आले. त्यांनी आपल्या कोटाची बटणे नीट केली आणि समोर बसलेल्या अफाट जनसागराकडे पाहिले. त्यांच्या त्या एका नजरेत करुणा, वेदना आणि क्रांतीची ठिणगी सामावलेली होती. टाळ्यांचा कडकडाट किंवा घोषणा देण्याचेही भान कोणाला राहिले नाही; इतका त्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव तिथे जाणवत होता. सूर्याचे तेज जसे ढगांच्या आड लपवता येत नाही, तसेच बाबासाहेबांचे ते ओजस्वी रूप त्या वातावरणात लख्खपणे उठून दिसत होते. त्यांनी माईकसमोर उभे राहून एकदा दीर्घ श्वास घेतला. त्यांच्या चेहऱ्यावरचे गांभीर्य आता एका महान संकल्पाचे रूप घेऊ लागले होते. आणि मग, तो सहज सुंदर आवाज घुमला...

'कोरेगावच्या युद्धस्मारकाला मी भेट दिली तेव्हाही मी एक गोष्ट निक्षून सांगितली... महार सैनिकांनी ब्रिटिशांच्या बाजूने लढावे ही अभिमानाची गोष्ट नसली तरी त्यांच्यावर ती पाळी कोणी आणली? स्पृश्य हिंदूंनी कुत्र्यां-मांजरांपेक्षा नीच वागणूक दिली म्हणूनच ना? पोट भरण्याचं साधन बंद झालं म्हणूनच ना? अरे तुमच्या तळ्यावर पक्षी, गुरं, कुत्री पाणी पिऊ शकतात. इतकंच काय तर मुसलमान आणि ख्रिस्तीही पाणी पिऊ शकतात. पण तुमच्याच धर्माच्या हिंदूंनी पाणी प्यायलं तर तुमचा धर्म बुडतो! ज्या देवाला तुम्ही मानता त्याच देवाला हा अस्पृश्य समाज मानीत नाही काय? राम कृष्ण हरी म्हणणाऱ्या आपल्याच बांधवांवर हा गलिच्छ अन्याय का? अहो मग तुम्ही कसले वेदमूर्ती?' त्यांचा आवाज आता अधिक धारदार झाला होता. 'या ब्रिटिशांनीदेखील एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, अस्पृश्यांना आता लष्करात भरती केले जात नाही. हा अन्याय आहे. हे आता चालणार नाही. सरकार देईल ते घ्यायचं, ही परंपरा आता बंद झाली पाहिजे. लक्षात घ्या भगिनी आणि बांधवांनो, आता अस्पृश्य समाजाने सरकारमध्ये शिरकाव केला पाहिजे. सरकार कोणाचं असतं, तर जे सरकारमध्ये नोकरी करतात त्यांचं. मग शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा... सरकारी नोकरीत प्रवेश करा. सरकारचे मत म्हणजेच सरकारी नोकरांचे मत. आता अस्पृश्य समाज मागे राहणार नाही. तो प्रत्येक आघाडीवर असेल. स्पृश्यांनी अस्पृश्यांना त्यांचा नागरिकत्वाचा अधिकार दिलाच पाहिजे, अस्पृश्यांना नोकरीवरही ठेवलंच पाहिजे, मेलेल्या जनावरांचे मांस खाण्याची पद्धत बंद झाली पाहिजे आणि सरकारी पाळतीवर ती बंद झाली पाहिजे.' बाबासाहेबांनी जनसमुदायाकडे पुन्हा एकदा पाहिले, यावेळी त्यांच्या डोळ्यांत एक प्रकारची आक्रमकता होती. 'पण केवळ भाषणे देऊन काही बदलणार नाही लोकहो. प्रत्यक्ष कृती केली पाहिजे. तर

चला, उठा भगिनी आणि बांधवांनो, हा आपला मोर्चा चवदार तळ्याकडे नेऊया...'

असे म्हणताच प्रेक्षकांमध्ये जणू विजेचा संचार झाला. एक प्रचंड ऊर्जा निर्माण झाली. मात्र काही बोलघेवडे पुढारी, जे केवळ शब्दांच्या खेळावर जगत होते, ज्यांनी आतापर्यंत मोठमोठी भाषणे ठोकली होती, ते प्रचंड घाबरले. 'अहो आंबेडकर, जनमत अजून तयार नाही. असे करू नका. प्रकोप होईल.' बाबासाहेब म्हणाले, 'बंधूराज, आमचे जसे विचार आहेत, तसेच आचारही आहेत बरे! बोलाचा भात नि बोलाची कढी ही आमची रीत नव्हे! आणि प्रकोप होणारच असेल तर या जनसागराचा होईल, माझ्या बांधवांचा होईल आणि तो प्रकोप अत्यंत सात्त्विक असेल.' बाबासाहेबांचे विश्वरूप पाहून बोलघेवडे नेते आपलं धोतर सावरत पळाले. बाबासाहेबांनी पुन्हा एकदा त्या अफाट जनसागराकडे पाहिले, जो आता एका आदेशाची वाट पाहत होता. 'चला, उठा, कूच करा...' आणि हा हा म्हणता तो जनसागर चवदार तळ्याकडे निघाला. हजारो पावले एकाच तालात पडू लागली. त्या पावलांच्या आवाजाने महाडची माती शहारली. हा केवळ पाण्यासाठीचा मोर्चा नव्हता, तर तो गुलामीच्या बेड्या मोडण्यासाठी निघालेला एक अजेय मानवी प्रवाह होता. पुढे बाबासाहेब आणि मागे त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवणारा तो अफाट जनसागर... इतिहासाचे एक नवे सोनेरी पान तिथे लिहिले जात होते.

चवदार तळ्याचा तो काठ... आज केवळ एक जलाशय नव्हता, तर तो मानवी गुलामगिरीच्या अंताची साक्ष देणारा एक महातीर्थ बनला होता. हजारो अनुयायांच्या साक्षीने बाबासाहेब आंबेडकर तळ्याच्या काठावर उभे राहिले. त्यांच्या रूपाकडे पाहिले की वाटायचे, साक्षात दलितांचा क्रांतिसूर्यच जमिनीवर उतरला आहे. कपाळावर ज्ञानाचे तेज, डोळ्यांत हजारो वर्षांच्या अन्यायाचा हिशोब आणि चेहऱ्यावर एक अढळ संकल्प. ते तिथे उभे असताना जणू काळाचे चक्र क्षणभर थांबले होते. वाराही स्तब्ध झाला होता आणि तळ्याचे ते पाणीही आपल्या मुक्तीदात्याची वाट पाहत शांत झाले होते. बाबासाहेबांनी तळ्याच्या पायऱ्यांकडे पहिले पाऊल टाकले. ते केवळ पायऱ्या उतरत नव्हते, तर ते एकामागून एक गुलामगिरीच्या बेड्या तोडत होते. पहिली पायरी उतरताना, जणू शतकानुशतके


**वाचकांच्या आग्रहास्तव नारायणी ग्रंथ पुनःप्रकाशित होत आहे.**


# •॥ नारायणी ॥•

**प्रकाशन : ऑक्टोबर २०२४ किंमत : ६००/-रु. । सवलत मूल्य : ५००/-रु.**

विवेक प्रकाशन

अनन्य भक्तकुळांची स्वामिनी कोल्हापूरची **'श्री महालक्ष्मी'** म्हणजेच दक्षिणकाशीचे दर्शन या 'नारायणी' ग्रंथाद्वारे आपणास घडणार आहे. श्रीचे माहात्म्य, मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना, मुख्य मंदिरासह परिसर मंदिराचे रंगीत छायाचित्रं. उपासना विभागात श्री महालक्ष्मी स्तोत्रे, सूक्त, कवच, अथर्वशीर्ष, सहस्रनामावली, श्रीयंत्र माहिती व पूजाविधी, ऋषीमुनींनी केलेली स्तुती यांच्या पठणाने श्रद्धेची अनुभूती आपण घेणार आहोत. १२५-१५० रंगीत फोटोद्वारे श्री महालक्ष्मीची विविध रूपातील पूजा, सुवर्ण पालखी, रजत रथोत्सव, अत्यंत दुर्मिळ व पुरातन 'श्रीं' च्या अलंकाराचे मनोहारी दर्शन या ग्रंथाद्वारे घडणार आहे. दैनंदिन पूजा, करवीर यात्रा, नवरात्रोत्सव या सर्वांचे नयनरम्य दर्शन या ग्रंथाद्वारे आपणास होणार आहे.

असा परिपूर्ण ग्रंथ मान्यवरांनी नावाजलेला, शंकराचार्यांचा आशीर्वाद लाभलेला ग्रंथ पूर्णतः रंगीत आर्टपेपरवर पुनः प्रकाशित होत आहे.




Accounts details. - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318

संपर्क : ९५९४९६१८५८

लादलेल्या अस्पृश्यतेची पहिली बेडी कडाकडा तुटली. दुसरी पायरी उतरताना, जणू हीनतेच्या भावनेची साखळी निखळली. तिसरी पायरी उतरताना, जणू अज्ञानाचा अंधकार दूर झाला. प्रत्येक पाऊल म्हणजे अन्यायाच्या छाताडावर दिलेला एक घाव होता. ज्या समाजाने त्यांना पशूपेक्षाही नीच मानले, ज्या समाजाने त्यांच्या सावलीचाही विटाळ मानला, त्या समाजाच्या अहंकाराला हे पाऊल चिरडत होते. तो अन्याय इतका भयानक होता की, तहानलेल्या घशाला पाणी नाकारले जाई, पण आज तो 'मूकनायक' त्या अन्यायाचा पाया मुळापासून उखडून टाकत होता. बाबासाहेब पायऱ्या उतरत तळ्यात आले. शांत, संथ आणि गंभीर... जणू एखादा महासागर दुसऱ्या महासागराला भेटायला चालला होता. त्यांनी वाकून आपल्या ओंजळीत पाणी घेतले. त्या सूर्यपुत्राने वर आकाशात तळपणाऱ्या सूर्यदेवतेकडे पाहिले. वरचा सूर्य आणि खालचा हा क्रांतिसूर्य... दोघांच्या तेजाची जणू भेट झाली होती. आकाशातील सूर्यानेही आपल्या किरणांनी जणू त्यांना 'तथास्तु' म्हटले.

हा अस्पृश्य समाज खरंच त्या सूर्यपुत्र कर्णासारखाच होता. ज्याप्रमाणे कुंतीने लोकलाजेस्तव पोटच्या गोळ्याला, कर्णाला आपल्यापासून विलग करून गंगेच्या प्रवाहात सोडून दिले, तसेच या दांभिक हिंदू समाजाने आपल्याच रक्ताच्या बांधवांना, अस्पृश्य मानून दूर फेकले होते. पण कर्णाकडे जशी जन्मतःच अभेद्य कवचकुंडले होती, तशीच बाबासाहेबांकडे 'शिक्षणा'ची आणि 'ज्ञाना'ची कवचकुंडले होती. बरं, ही कवचकुंडले कुणी भेट म्हणून दिली नव्हती, तर या महर्षीने ती स्वबळाने कमावलेली होती. आणि या ज्ञानाच्या कवचाला जगातील कोणतीही शक्ती भेदू शकणार नव्हती. बाबासाहेबांनी ओंजळीतले ते पाणी हळूच प्राशन केले. तो पाण्याचा एक घोट नव्हता, तर तो कित्येक सहस्रकांच्या अत्याचाराविरुद्ध पुकारलेला एक एल्गार होता! ते पाणी त्यांच्या कंठातून उतरले आणि एका क्षणात हजारो वर्षांची गुलामगिरी भस्मसात झाली.

त्यांच्या मागोमाग हजारो अनुयायांनी त्या तळ्याचे पाणी आपल्या ओंजळीत घेतले आणि मुक्तपणे प्राशन केले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो!' या गर्जनेने जणू आकाश फाटून गेले. ज्या पाण्यासाठी त्यांना लाठ्या–काठ्या खाव्या लागल्या होत्या, ज्या पाण्यासाठी त्यांना अपमानाचे विष प्यावे लागले होते, तेच पाणी आज त्यांच्यासाठी अमृताचे बनले होते. लोकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. मुलांनी पाण्यात उड्या घेतल्या, बायकांनी आपले हंडे भरून घेतले. आज खऱ्या अर्थाने हा समाज 'माणूस' म्हणून जन्माला आला होता. चवदार तळ्याचा तो परिसर एका महान क्रांतीचा साक्षीदार झाला होता. सूर्य मावळतीला झुकला होता, पण महाडच्या या मातीत मात्र एका नव्या पहाटेचा सूर्योदय झाला होता. एका महामानवाच्या संकल्पाने, एका अथांग जनसागराला आपली ओळख आणि आपला अधिकार मिळवून दिला होता. तो दिवसही इतिहासात कोरला गेला. तो दिवस होता २० मार्च १९२७!

तिथे रत्नागिरीतही सहभोजनाच्या चळवळीने सनातनी मंडळींची झोप उडवली होती. सावरकरांच्या कार्यात सहभागी होणे हे पाप मानले जाऊ लागले होते. पण हे पाप करण्यासाठी अनेक तरुण पुढे सरसावत होते. एकदा सावरकरांच्या कार्यात सहभागी असणारा एक कार्यकर्ता गंभीर आजारी पडला. लगेच रत्नागिरीत चर्चा पसरली. सावरकर अनिष्ट, धर्मविरोधी गोष्टी करतात आणि त्यांच्या कार्यात हा सहभागी व्हायचा. देवाचा कोप तर होणारच ना. महापापी आहे तो सावरकर. आपल्या मुलांना वाचवा त्यापासून...

'महापापी आहे तो सावरकर. आपल्या मुलांना वाचवा त्यापासून' हे शब्द मुक्ताईच्या कानावर पडले आणि जणू तिच्या काळजात कोणीतरी तापलेली सळई खुपसली. महापापी म्हणजे नेमके काय हे मुक्ताईला ठाऊक नव्हते. पण ती शिवी असावी असा अंदाज तिने बांधला. पण सावरकर तर देवदूत आहेत. मग त्यांना का महापापी म्हणतात? तिच्या डोळ्यांसमोरून सावरकरांचा रत्नागिरी प्रवेश ते आतापर्यंतचा काळ एखाद्या चित्रपटाप्रमाणे सरकत गेला. मुक्ताई आता तशी सुजाण होत होती. शाळेत जायला लागल्यामुळे तिला समाजाची तिच्या आकलनाप्रमाणे जाणीव होत होती. सावरकरांना महापापी म्हणणे तिला पटले नव्हते. तिच्या मनात संतापाची एक लाट उसळली, पण त्यासोबतच एक अनामिक भीतीही दाटून आली. समाजाचे हे क्रूर रूप पाहून ती सुन्न झाली. ज्या हातांनी समाज जोडण्याचे काम केले, त्याच हातांना हे लोक अशुद्ध ठरवत होते. मुक्ताईने आपले पाऊल वेगाने घराकडे वळवले, पण ते शब्द, 'महापापी आहे तो सावरकर' तिच्या कानात एखाद्या भयाण नादासारखे घुमत राहिले. रत्नागिरीच्या आकाशात आता संघर्षाचे ढग अधिकच गडद होऊ लागले होते.

क्रमशः

# लोककलांच्या जतन-संवर्धनासाठी स्वतंत्र लोककला विद्यापीठाची गरज

## - कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर

पुणे, प्रतिनिधी : जनसामान्यांच्या जीवनाचा कलात्मक आविष्कार असलेल्या लोककला आज कालबाह्य होण्याच्या उंबरठ्यावर असून महाराष्ट्राचा हा अमूल्य सांस्कृतिक ठेवा जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी स्वतंत्र लोककला विद्यापीठाची स्थापना होणे ही काळाची गरज आहे. शासनाने लोककलावंतांना आणि लोककलेच्या उपासकांना एका व्यासपीठावर आणण्याची संधी उपलब्ध करून दिली, हीच ऐतिहासिक बाब आहे. हा लोककलावंतांचा पहिलाच महोत्सव ठरला आहे, असे प्रतिपादन रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि समरसता साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या समारोप समारंभात अध्यक्षस्थानावरून त्यांनी केले. डॉ. आवलगावकर म्हणाले, शासनाने दरवर्षी अशा प्रकारचे लोककला संमेलन आयोजित करावे. लोककला हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय असून भारतातील विविध राज्यांतील लोककलांना एकत्र आणण्यासाठी भविष्यात भारतीय लोककला महोत्सव आयोजित करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. या उपक्रमासाठी मराठी भाषा विद्यापीठ या कार्यात सदैव सहकार्य करेल, अशी ग्वाहीही डॉ. आवलगावकर यांनी दिली.

यावेळी संमेलनाध्यक्ष पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी लोककला संमेलन घेतल्याबद्दल आनंद व्यक्त करत असतानाच मुख्यमंत्री व सांस्कृतिक मंत्री संमेलनाला उपस्थित राहू न शकल्याबद्दल खंत व्यक्त केली.



यावेळी व्यासपीठावर नंदेश उमप, मंगला बनसोडे, लीला गांधी, जयमाला इनामदार, सुरेखा पुणेकर, छाया व माया खुटेगावकर, स्वागताध्यक्ष धीरज घाटे, समरसता साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. प्रसन्न पाटील आदी उपस्थित होते. संमेलनात ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या लोककला क्षेत्रातील प्रदीर्घ आणि मोलाच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. त्यांच्या अनुपस्थितीत हा सन्मान त्यांच्या भगिनी रत्ना कांबीकर यांनी स्वीकारला. संमेलनाचे प्रमुख आकर्षण ठरल्या त्या मान्यवर लोककलावंतांच्या मनमोकळ्या मुलाखती. नंदेश उमप, रघुवीर खेडकर, मंगला बनसोडे, सुरेखा पुणेकर आणि जयमाला इनामदार यांच्या मुलाखतींमधून लोककलेचा संघर्षमय प्रवास, समृद्ध परंपरा आणि भावी वाटचाल यांचे प्रभावी दर्शन घडले.

समरसता लोककला संमेलनात लोककला, लोकसाहित्य आणि लोकपरंपरांच्या जतन, संवर्धन व विकासाच्या दृष्टीने सात महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. या ठरावांचे वाचन काशीनाथ पवार यांनी केले. उपस्थित लोककलावंत, साहित्यिक, अभ्यासक आणि रसिकांनी हात उंचावून या ठरावांना उत्स्फूर्त अनुमोदन देत त्यांना एकमुखी मान्यता दिली. समरसता लोककला साहित्य संमेलनात लोककला, लोकसाहित्य आणि लोकपरंपरांच्या जतन, संवर्धन व विकासासाठी सात महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. जिल्हास्तरावर प्रशिक्षण व संशोधन केंद्रे स्थापन करणे, उपेक्षित लोककलांना मुख्य प्रवाहात स्थान देणे, शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात लोकसंस्कृतीचा समावेश करणे, लोककलावंतांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा प्रदान करणे, लोप पावत चाललेल्या लोककलांचे डिजिटल दस्तऐवजीकरण करणे, नवोदित कलावंत व संशोधकांना प्रोत्साहन देणे आणि स्वतंत्र लोककला विद्यापीठाची स्थापना करणे, अशा प्रमुख मागण्या या ठरावांमध्ये करण्यात आल्या. या ठरावांतून लोककलावंतांचे सक्षमीकरण, लोकसंस्कृतीचे शाश्वत संवर्धन आणि समरस समाजनिर्मितीचा दृढ संकल्प व्यक्त करण्यात आला असून, शासनाने ते तातडीने अमलात आणावेत, अशी एकमुखी मागणी संमेलनात करण्यात आली.

कविसंमेलनानेही रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले. प्रसिद्ध रानकवी तुकाराम धांडे, ज्येष्ठ कवी वा. ना. आंधळे आणि युवा कवी कुमार चव्हाण यांच्या ओजस्वी, संवेदनशील आणि जीवनस्पर्शी कवितांनी उपस्थितांना अंतर्मुख केले.पारंपरिक वेशभूषेतील गोंधळी, वाघ्या–मुरळी, वासुदेव, भारूड, शाहिरी,



लावणी, आदिवासी नृत्य, झाडीपट्टी आदी लोककलांच्या बहारदार सादरीकरणाने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे वैभव साकार झाले. या रंगतदार लोककलादर्शनाने संपूर्ण परिसर सांस्कृतिक उत्साहाने दुमदुमून गेला आणि रसिक प्रेक्षक अक्षरशः भारावून गेले. यावेळी मा. डॉ. प्रवीण भोळे यांनी लोककलेचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करणारे अभ्यासपूर्ण चिंतन मांडले. संमेलनातील भव्य लोककला दिंडीत एक हजारांहून अधिक लोककलावंत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. तसेच, दुर्मिळ होत चाललेल्या पारंपरिक लोकवाद्यांचे वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन हेही संमेलनाचे विशेष आकर्षण ठरले.संमेलनाचे प्रास्ताविक धनंजय खुडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय मोरे, डॉ. धनंजय भिसे आणि जितेंद्र वाईकर यांनी अत्यंत प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि नेटकेपणाने पार पाडले, तर विविध लोककलांचे सादरीकरण करून या भव्य, वैचारिक आणि लोकसंस्कृतीच्या वैभवाने उजळून निघालेल्या संमेलनाची सांगता केली.

---

# समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. ईश्वर नंदपुरे यांच्या पुस्तकाचे जागतिक पातळीवर प्रकाशन

दिनांक ४ जुलैला अमेरिकेच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त अमेरिकेत आंतरराष्ट्रीय दर्जाची बौद्ध विहार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेची कास धरून उभारण्यात आले. त्या विहाराचे विधिवत जागतिक स्तरावरील विद्वान जणांच्या उपस्थितीत भिक्षु संघाच्या पावन मंत्रांनी पुनीत झालेल्या भूमीत टेक्सासमधील डलास शहरात त्याच कार्यक्रमात त्याच विचार पीठावर समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. ईश्वर नंदपुरे यांच्या 'धम्मपद आणि मूल्यविचार' या संशोधनपर वैचारिक ग्रंथाचे थाटात प्रकाशन झाले.

